# लोकनेते दि.बा. पाटील यांचे कार्य प्रेरणादायी

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचे गौरवोद्गार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

**महाराष्ट्राच्या विकासाचे नवे केंद्रबिंदू ठरणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बुधवारी (दि.८) उद्घाटन करण्यात आले. या वेळी पंतप्रधानांनी आपल्या भाषणात महाराष्ट्राचे सुपुत्र लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे स्मरण करीत त्यांनी समाज, शेतकऱ्यांसाठी ज्या सेवाभावाने काम केले ते सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे गौरवोद्गार टाळ्यांच्या कडकडाटात काढले.**

रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ८२
www.ramprahar.com
गुरुवार, ९ ऑक्टोबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २



# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे शानदार उद्घाटन




(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

या सोहळ्याला व्यासपीठावर महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय नागरी उड्डयनमंत्री किंजरापु राममोहन नायडू, केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, केंद्रीय नागरी उड्डयन राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री सर्वश्री गणेश नाईक, आशिष शेलार, मंगलप्रभात लोढा, माधुरी मिसाळ, आदिती तटकरे, प्रताप सरनाईक, भरत गोगावले, भारतातील जपानचे राजदूत ओनो केईची, अदानी ग्रुपचे चेअरमन गौतम अदानी, खासदार श्रीरंग बारणे, धैर्यशील पाटील, आमदार सर्वश्री प्रशांत ठाकूर, महेश बालदी, मंदा म्हात्रे, विक्रांत पाटील आदी उपस्थित होते. या सोहळ्याला माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, आमदार सर्वश्री निरंजन डावखरे, चित्रा वाघ, महेंद्र थोरवे यांच्यासह इतर लोकप्रतिनिधी, विविध संस्थांचे पदाधिकारी, 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील व कुटुंबीय, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, नवी मुंबईचे प्रदीर्घ काळाचे स्वप्न आज पूर्ण झाले आहे. मुंबईला अखेर दुसरे विमानतळ मिळाले असून या शहराला भूमिगत मेट्रोही मिळाली आहे. नवी मुंबई विमानतळामध्ये विकसित भारताची झलक दिसते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमीत असलेले हे विमानतळ संस्कृती आणि समृद्धीचे प्रतीक आहे. या क्षेत्राला आशियाच्या सर्वात मोठ्या कनेक्टिविटी हबच्या रूपाने स्थापन करण्यासाठी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ खूप मोठी भूमिका निभावणार आहे

या विमानतळाच्या उद्घाटनाबद्दल मी तमाम जनतेचे अभिनंदन करतो. या क्षणी महाराष्ट्राचे सुपुत्र लोकनेते दि.बा. पाटील यांचेही स्मरण करतो. त्यांनी समाज, शेतकऱ्यांसाठी ज्या सेवाभावाने काम केले ते आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांचे जीवन समाजात काम करणाऱ्यांना नेहमी प्रेरित करीत राहिल, असे गौरवोद्गार पंतप्रधान मोदींनी या वेळी काढले.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून महाराष्ट्राचे शेतकरी युरोप आणि बाहेरच्या देशांबरोबरदेखील जोडले जातील. या विमानतळामुळे नवे उद्योग येतील, मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येईल. जेव्हा आपल्या स्वप्नाला सिद्ध करण्याचा संकल्प असतो, जेव्हा देशवासीयांपर्यंत विकास पोहचवण्याची इच्छा शक्ती असते तेव्हा मार्गदेखील निघतो. आपली हवाई सेवा यांचे एक उदाहरण आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

विकसित भारताचे काम वेगाने सुरू आहे. जेव्हा पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण होत असते तेव्हा भारताचा वेग दिसून येतो. जेव्हा २०१४मध्ये जनतेने मला संधी दिली तेव्हा मी म्हटले होते की, हवाई चप्पल घालणाऱ्यालाही हवाई प्रवास करता यायला हवा या स्वप्नाला पूर्ण करणे गरजेचे होते. देशात नवनवीन विमानतळ बनवले जावेत यावर आमच्या सरकारने काम सुरू केले. २०१४पर्यंत आपल्या देशात फक्त ७४ विमानतळे होती, पण आज भारतातील एकूण विमानतळांची संख्या १६०च्या पुढे गेली आहे, असे पंतप्रधान मोदींनी सांगितले.

### विविध उपक्रमांचा शुभारंभ; दिवाळीच्या शुभेच्छा!

सन २०१८ साली नवी मुंबई विमानतळाच्या कामाचे भूमिपूजनही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते. विमानतळाच्या उद्घाटनासोबतच या सोहळ्यात मुंबई वन अॅप आणि शासकीय आयटीआय व शासकीय तांत्रिक माध्यमिक विद्यालयांमध्ये अल्प मुदतीचे रोजगारक्षम कार्यक्रमाचे अनावरण झाले तसेच मुंबई मेट्रो लाईन-३चे उद्घाटनही पंतप्रधान मोदींच्या हस्ते झाले. या वेळी त्यांनी विजयादशमी झाली, कोजागिरी झाली, आता १० दिवसांनी दिवाळी आली आहे. त्यासाठी तुम्हाला खूप खूप शुभेच्छा, अशा मराठीत सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या.

या वेळी पंतप्रधान मोदींनी काँग्रेसच्या कुचकामी धोरणावर टीका केली. ते म्हणाले, मुंबई ही केवळ आर्थिक राजधानीच नाही तर भारतातील सर्वात गतिमान शहरांपैकी एक आहे. २००८मध्ये दहशतवाद्यांनी मुंबईवर हल्ला केला, पण तत्कालीन काँग्रेस सरकारने कमकुवतपणाचा संदेश दिला. अलिकडेच एका ज्येष्ठ काँग्रेस नेत्याने आणि माजी गृहमंत्र्यांनी खुलासा केला की, मुंबई हल्ल्यानंतर आमचे सुरक्षा दल पाकिस्तानवर हल्ला करण्यास तयार होते, मात्र दुसऱ्या देशाच्या दबावामुळे त्यावेळच्या काँग्रेस सरकारने आमच्या सुरक्षा दलांना थांबवले. काँग्रेसने हे सांगायला हवे की परदेशी शक्तीच्या दबावाखाली हा निर्णय कोणी घेतला? देशाला याचे उत्तर हवे आहे. काँग्रेसच्या कमकुवतपणामुळे दहशतवाद्यांना बळकटी मिळाली. देशाला वारंवार जीवांचे बलिदान देऊन या चुकीची किंमत मोजावी लागली आहे. आमच्यासाठी राष्ट्रीय सुरक्षा आणि आमच्या नागरिकांच्या सुरक्षिततेपेक्षा काहीही महत्त्वाचे नाही, असे पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट केले. सध्याचा भारत हा घरात घुसून मारणारा आहे. नुकतेच भारताने राबवलेले ऑपरेशन सिंदूर त्याचे उदाहरण असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रात काही काळासाठी वेगळे सरकार आले. त्यांनी मेट्रोचे काम थांबवले. त्यांना सत्ता मिळाली, पण देशाला हजारो कोटींचे नुकसान झाले. मुंबईकरांना असुविधेचा सामना करावा लागला. आता मुंबई मेट्रोचे काम पूर्ण झाले आहे. मुंबईत एका एका मिनिटाचे महत्त्व आहे. तिथे मुंबईकरांना या प्रकल्पासाठी चार ते पाच वर्षांची वाट पाहावी लागली हे कोणत्याही पापापेक्षा कमी नाही, अशा शब्दांत पंतप्रधान मोदींनी ठाकरे सरकारच्या काळावर बोट ठेवले.

आज कौशल्य विकासासंदर्भात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आला आहे. भारत हा तरुणांचा देश आहे. सध्याचा काळ हा देशातील तरुणाईला विविध संधी उपलब्ध करून देणार आहे. संपूर्ण देश हा विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी प्रयत्नशील आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

केंद्रीय नागरी उड्डयनमंत्री किंजरापू राममोहन नायडू यांनी आपल्या भाषणात हवाई वाहतुकीचा आढावा मांडला तसेच त्यांनी या वेळी मराठी भाषेतही भाषण केले, तर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आपल्या भाषणातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाचा शाश्वत विकास होत असल्याचे नमूद केले.

### राज्याचा जीडीपी एक टक्क्याने वाढणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आम्ही वर्षानुवर्षे हे विमानतळ होणार असे ऐकायचो. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे बैठक घेतली आणि १५ दिवसांत विमानतळाच्या कामाला मंजुरी मिळाली. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात देशात भाजपप्रणित सरकार आल्यानंतर नवी मुंबई विमानतळाच्या कामाला वेग आला. केवळ काही तासांमध्ये दहा वर्ष झाले नव्हते, ते पंतप्रधान मोदी यांच्या बैठकीनंतर झाले. आजचा दिवस स्वप्नपूर्तीचा आहे. या विमानतळामुळे राज्याचा जीडीपी एक टक्क्याने वाढणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

### पंतप्रधान मोदींचा जिथे हात लागतो तिथे सोने होते -उपमुख्यमंत्री शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, ज्या ठिकाणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हात लागतो, तिथे सोने होते. नवीन भारताचा संकल्प हा मोदीजींच्या विश्वासाचे प्रतीक आहे, असे सांगितले. ते पुढे म्हणाले की, जनतेच्या हिताचे विकासकाम केवळ आणि केवळ महायुती सरकारच करू शकते. मेट्रो, नवी मुंबई एअरपोर्ट आम्ही आणले. काहींनी मधल्या काळात स्पीडब्रेकर लावला, पण आमचे सरकार आले आणि काम सुसाट झाले. विकासकामांच्या जोरावर येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महायुती विजयी होईल.

### महाराष्ट्राला पंतप्रधान मोदींकडून नेहमीच साथ -उपमुख्यमंत्री पवार

आजचा दिवस केवळ मुंबईच नाही, तर महाराष्ट्रासाठी मोठा आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या उभारणीचा प्रवास इतका सोपा नव्हता. तो आता पूर्ण झाला आहे. या विमानतळामुळे प्रवासाबरोबरच व्यापार, गुंतवणूक, पर्यटन आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत, असे सांगून उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, राज्यात सध्या पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. संकटाच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्राला नेहमी साथ देतात. या वेळीही ते महाराष्ट्राला निश्चितपणे मदत करतील असा विश्वास आहे.




---

## रायगडात भात कापणीला सुरुवात

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात भात कापणीला सुरुवात झाली आहे. तयार झालेले भाताचे पीक वाया जाण्यापूर्वी ते वाचवण्याची धडपड जिल्ह्यातील शेतकरी करत आहे. नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत ही कामे पूर्ण होतील, असा अंदाज आहे.

कापणी हंगाम सुरू झाल्याने ग्रामीण भागात मजुरांना रोजगाराची संधी मिळाली आहे. दिवसाला ३०० ते ४०० रुपये मजुरी मिळत असून हे काम २० ते २५ दिवस चालणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसह मजुरांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे. हवामान अनुकूल राहिल्यास आणि पावसाने दगाफटका केला नाही, तर यंदा भात उत्पादन समाधानकारक होईल, असा विश्वास कृषी विभागाने व्यक्त केला आहे.

जिल्ह्यात यंदा ८५ हजार हेक्टर क्षेत्रावर भात पिकांची लागवड करण्यात आली आहे. कोलम, सुवर्णा, रत्ना या जातींना शेतकऱ्यांनी प्राधान्य दिले आहे. हवेत गारवा निर्माण झाल्याने पिके बहरली आहेत. शेतकरी कापणीच्या कामात व्यस्त आहेत. दुपारी उन्हाचा तडाखा वाढत असल्याने सकाळच्या वेळेत लवकर कापणीची कामे केली जात आहेत.

या वर्षी जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. वार्षिक पर्जन्यमानाच्या सरासरी ८३.७ टक्के पावसाची नोंद झाली आहे. सरासरीच्या १६ टक्के पाऊस कमी झाला आहे. असे असले तरी योग्यवेळी योग्य प्रमाणात झालेला पाऊस भातशेतीसाठी पूरक ठरला. त्यामुळे यंदा भाताचे पीक चांगले आले. नवरात्रापूर्वी आणि नवरात्रीच्या काळात झालेल्या पावसाने जिल्ह्याच्या अनेक भागात उभी पिके आडवी झाली. अंदाजे दोन हजार हेक्टरपेक्षा अधिकच्या क्षेत्रावर झाले आहे. परतीच्या पावसाने शेतीचे नुकसान झाले असले तरीदेखील उर्वरित क्षेत्रातील पिके सध्या उत्तम स्थितीत असून शेतकरी कापणीच्या तयारीला लागले आहेत.



## शिवसेना पक्ष, चिन्हाची सुनावणी पुन्हा लांबणीवर

**मुंबई** : जवळपास गेल्या अडीच-तीन वर्षांपासून सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या वादाबाबतच्या प्रकरणाची सुनावणी पुन्हा एकदा लांबणीवर पडली आहे. सर्वोच्च न्यायालय बुधवारी (दि. ८) या महत्त्वाचा निकाल देईल, अशी चर्चा रंगली होती, मात्र ऐनवेळी सशस्त्र सुरक्षा दलांसंदर्भात एक प्रकरण सुनावणीला आल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने इतर प्रकरणांची सुनावणी आटोपती घेतली. त्यामुळे शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या वादाबाबत अंतिम युक्तिवाद होऊ शकला नाही. आता सर्वोच्च न्यायालयात १२ नोव्हेंबरला या प्रकरणाची पुढील सुनावणी आहे.

या संदर्भात शिवसेना आमदार संजय शिरसाट यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, न्यायालयात आम्ही आमची बाजू भक्कमपणे मांडली आहे. कायद्यानुसार आमची बाजू भक्कम आहे. न्यायालय जो काही निकाल देईल तो आम्हाला मान्य असेल. प्रत्येकवेळी न्यायालयाला आरोपीच्या पिंजऱ्यात ठेवणे ही उबाठा गटाची मानसिकता झाली आहे. निकाल आमच्या विरोधात लागला तर संविधानानुसार, त्यांच्याविरोधात लागला तर संविधानाचा भंग, मग न्यायालयावर ताशेरे ओढायला ते कमी करणार नाहीत. राज्यघटना मान्य आहे की नाही ते सांगा? जो निकाल लागेल तो मान्य करावा लागेल.

## 'झुंड' चित्रपटात काम करणारा खराखुरा गुन्हेगार बाबू छत्रीची हत्या

**नागपूर : प्रतिनिधी**

तीन वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या 'झुंड' या चित्रपटात अमिताभ बच्चन यांच्यासोबत काम करणारा अभिनेता प्रियांशू क्षत्रिय उर्फ बाबू छत्री याची नागपुरात हत्या करण्यात आली. या चित्रपटात प्रियांशूची महत्त्वाची भूमिका होती.



वैयक्तिक वैमनस्यातून आरोपीने प्रियांशूचा गळा वायरने चिरून निर्घृणपणे हत्या केल्याचे वृत्त आहे. नागपूरच्या जरीपटका पोलीस ठाणे परिसरातील नारा परिसरात ही घटना घडली. प्रियांशू क्षत्रिय खरा खुरा गुन्हेगार होता.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार बुधवारी पहाटे १.३०च्या सुमारास प्रियांशू क्षत्रिय जखमी अवस्थेत आणि वायरने बांधलेला आढळला. स्थानिकांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर पोलीस घटनास्थळी पोहचले आणि प्रियांशूला मेयो रुग्णालयात दाखल केले, मात्र तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. बाबू छेत्री म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रियांशूवर यापूर्वीही गुन्हे दाखल असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. त्याची बहीण शिल्पा छेत्री यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला असून ध्रुव शाहू नावाच्या आरोपीला अटक केली आहे. प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की, हत्येमागे वैयक्तिक वैमनस्य हे कारण होते. अधिक तपास सुरू आहे.

## ओबीसी विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात होणार वसतिगृह

**मुंबई : प्रतिनिधी**

ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृह, कार्यालय आणि अभ्यासिका उभारण्यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करून जागा निश्चित करण्याचे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत.

या संदर्भात बुधवारी (दि.८) मंत्रालयात बावनकुळे यांच्या दालनात बैठक झाली. या बैठकीत अनेक जिल्ह्यांमधील जागा निश्चितीच्या प्रक्रियेला अंतिम स्वरूप देण्यात आले. ज्या जिल्ह्यांमध्ये जागा अद्याप निश्चित केलेली नाही, त्यांनी तातडीने योग्य जागा निश्चित करून प्रस्ताव सादर करावेत, जिल्हाधिकाऱ्यांनी जमीन हस्तांतरण प्रक्रियेसाठी मोजणी शुल्क माफ करावे, अशा सूचना मंत्री बावनकुळे यांनी या वेळी दिल्या.

# महाराष्ट्रात उद्योजकांसाठी पोषक वातावरण -मुख्यमंत्री फडणवीस

## गुंतवणुकदारांनी महाराष्ट्रात पुढाकार घेण्याचे आवाहन



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासन 'इज ऑफ डूईंग बिझनेस' धोरण राबवित आहे. या माध्यमातून गुंतवणुकदारांच्या समस्या निकालात काढण्याचे शासनाचे धोरण आहे. यामुळे महाराष्ट्रातील गुंतवणूक फायदेशीर आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक उद्योगस्नेही राज्य असून दळणवळणाच्या चांगल्या सुविधा उपलब्ध आहेत. शिक्षण क्षेत्रातही विविध देशातील उत्कृष्ट विद्यापीठांसोबत भागीदारी करण्यात आली असून मोठ्या प्रमाणावर कुशल मनुष्यबळ तयार होत आहे. राज्यात उद्योगांसाठी पोषक वातावरण असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

हॉटेल ताज पॅलेस येथे मुख्यमंत्री फडणवीस यांनी ब्रिटिश शिष्टमंडळाची भेट घेतली. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील गुंतवणूक वातावरण, पायाभूत सुविधा आणि भावी विकास आराखड्याबाबत सविस्तर माहिती दिली.ज्याप्रमाणे लंडन म्हणजे युकेची ओळख आहे, त्याचप्रमाणे मुंबई म्हणजे महाराष्ट्र आणि महाराष्ट्र म्हणजे भारत अशी ओळख असल्याचे सांगून 'इज ऑफ डूईंग बिझनेस' धोरणामुळे उद्योग परवाने मिळविण्याची प्रक्रिया अधिक सोपी झाली आहे. गुंतवणूकदारांच्या समस्या सोडविण्यासाठी 'वॉर रूम' स्थापन करण्यात आली आहे.

नवी मुंबई येथे 'एज्यु सिटी' उभारण्यात येत आहे, ज्यामध्ये लंडन विद्यापीठाचा कॅम्पस असणार असून येथे दोन हजार विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सोय केली जाणार आहे. नवी मुंबई विमानतळ, सी–लिंक आणि 'तिसरी मुंबई' या प्रकल्पांच्या माध्यमातून राज्यात आधुनिक शहरी विकास होत आहे. वाढवण बंदर विकसित केले जात असून याठिकाणी बुलेट ट्रेन स्थानक आणि ग्रीन इंडस्ट्रियल झोनच्या माध्यमातून हा परिसर 'चौथी मुंबई' म्हणून विकसित होत असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर हे ईव्ही हब बनत आहे, नागपूर सोलर मॉड्यूल उत्पादन केंद्र बनत आहे, तर पुणे हे उद्योगांचे प्रमुख केंद्र आहे. महाराष्ट्र देशातील स्टार्टअप्स आणि गुंतवणुकीत आघाडीवर आहे. इन्फ्रास्ट्रक्चर विकासामुळे भारत आज गुंतवणूक स्नेही देश बनला असल्याचे सांगत त्यांनी प्रशासनात पारदर्शकता वाढल्याचे नमूद केले.

ब्रिटन आणि भारतातील भागीदारी आणखी दृढ व्हावी, यासाठी प्रयत्नशील असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.ब्रिटिश शिष्टमंडळातील सदस्यांनीही महाराष्ट्रातील वेगाने वाढणाऱ्या उद्योगक्षेत्राबद्दल समाधान व्यक्त केले. एआय आणि तंत्रज्ञान क्षेत्रात महाराष्ट्रात गुंतवणुकीची इच्छा व्यक्त केली. राज्यात सुरू असलेल्या विकासकामांचे कौतुक करून राज्यात गुंतवणुकीसाठी उत्सुक असल्याचेही उपस्थित सदस्यांनी सांगितले.

## मंत्री गोगावलेंनी मध्यरात्री रस्त्यावरील अपघातग्रस्त तरुणांना दिला मदतीचा हात

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**



मंत्री भरत गोगावले यांचा ताफा मुंबई वरून महाड कडे येत असताना निजामपूर जवळील कांदळगाव फाटा येथे मंगळवारी मध्यरात्री १ वाजताच्या सुमारास अपघातग्रस्त दोन तरुण गंभीर जखमी अवस्थेत रस्त्यावर पडले होते. मंत्री भरत गोगावले यांनी आपल्या ताफ्यातील गाडीतून त्या अपघातग्रस्त तरुणांना उपचारासाठी माणगांव उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

मंत्री भरत गोगावले यांनी स्वतः माणगांव उपजिल्हा रुग्णालयात थांबून अपघातग्रस्त तरुणांवर त्वरित प्राथमिक उपचार करण्यास डॉक्टरांना सांगितले.तातडीने प्राथमिक उपचार मिळाल्यामुळे अपघातग्रस्त तरुणांच्या जीवितास असलेला धोका टळला गेला.

एवढेच नाही तर त्या अपघातग्रस्त तरुणांच्या काळजीपोटी त्यांचे सिटीस्कॅन रिपोर्ट्स, तब्बेतीची पहाटेपर्यंत चौकशी करत, फोनद्वारे युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांना अपघातग्रस्ताना सर्वतोपरी सहकार्य करण्याच्या सूचना देत होते.

रात्री-अपरात्री, संकटसमयी धावून जाणारे आमदार अशी मंत्री भरत गोगावले यांची ख्याती संपुर्ण महाराष्ट्रामध्ये आहे. राज्याचे मंत्री झाल्यानंतर व्यस्त कार्यक्रमामधून सुद्धा त्यांच्या कार्यपद्धतीमध्ये कोणताही बदल झाला नाही नसून, निःस्वार्थ वृत्तीने जनतेच्या सेवेसाठी २४ तास उपलब्ध असणारा नेता अशी त्यांची ओळख आजही कायम आहे.

यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, माणगाव सहाय्यक पोलीस निरीक्षक नरेंद्र बेलदार, स्वीय सहाय्यक सुशांत जगताप, भिकाजी मांढरे, शंकर शिंदे, सतीश निकम, युवासेना तालुका संपर्कप्रमुख संतोष पोळेकर, सचिन भोईर,अनुज शिंदे, स्वप्नील सावंत, श्रेयस सुर्वे,तुषार गायकवाड, उपजिल्हा रुग्णालयाचे डॉक्टर्स, कर्मचारी उपस्थित होते.

## माणगावात आज भव्य शोभायात्रा निघणार

**माणगाव :** अखंड हिंदुस्थानाचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराजांचे अंगरक्षक म्हणून अफजलखान वध प्रसंगी अतुलनीय पराक्रम बजावणारे वीर जिवाजी महाले यांच्या जन्मोत्सवानिमित्त माणगांव शहरात भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम माणगांव शहर नाभिक समाज संघटनेतर्फे गुरुवार, दि.९ ऑक्टोबर रोजी होणार आहे. सकाळी ११ वा. दीपप्रज्वलन, प्रतिमापूजन व प्रमुख अतिथींचे स्वागत त्यानंतर रविंद्र चांगण गुरुजी यांचे व्याख्यान अणि दुपारी ३ भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

## लोणेरेच्या उपसरपंचपदी शिवसेनेच्या संगीता शिर्के यांची बिनविरोध निवड



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील लोणेरे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाच्या निवडणुकीत उसरघर नवघरवाडी येथील शिवसेनेच्या संगीता संतोष शिर्के यांची बिनविरोध निवड झाली आहे. ही निवडणूक प्रक्रिया सरपंच प्रकाश टेंबे यांच्या अध्यक्षतेखाली शांततेत आणि पारदर्शकपणे पार पडली.

यापूर्वीच्या उपसरपंच सुजाता टेंबे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने उपसरपंच पद रिक्त झाले होते. त्यानंतर ग्रामपंचायतीकडून निवडणुकीची प्रक्रिया सुरु करण्यात आली. नामांकन दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी शिवसेनेच्या उमेदवार संगीता संतोष शिर्के यांनीच एकमेव अर्ज दाखल केला. कोणताही विरोधक उमेदवार नसल्याने निवडणूक बिनविरोध घोषित करण्यात आली.सरपंच प्रकाश टेंबे यांनी निवड प्रक्रिया पूर्ण करून संगीता शिर्के यांच्या निवडीची औपचारिक घोषणा केली. या प्रसंगी ग्रामसेवक नरेंद्र घाडगे यांनी सचिव म्हणून जबाबदारी पार पाडली.

कार्यक्रमास माजी सरपंच व विद्यमान सदस्य रविंद्र टेंबे, समाधान करकरे, प्रमोद करकरे, ज्योती दीपक ढेपे, शिवाजी ढेपे, तसेच लेखनिक रमेश टेंबे, ग्रामपंचायत कर्मचारी संतोष करकरे, सौरभ खाडे, प्रमिला उतेकर, संतोष धसाडे, आदित्य मोरे, उज्वला करकरे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी शिवसेना संपर्कप्रमुख अरुण चालके, माजी जिल्हा परिषद सदस्या अर्पणा घोसाळकर, तसेच उसरघर नवघरवाडीचे ग्रामस्थ व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्याने निवड झालेल्या उपसरपंच संगीता शिर्के यांचे शाळ श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.या निवडीमुळे लोणेरे ग्रामपंचायतीत महिलांच्या नेतृत्वाला अधिक बळ मिळाले असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. शिवसेना कार्यकर्त्यांमध्येही या विजयानंतर आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

## अलिबाग नगर परिषदेत १० जागा महिलांसाठी राखीव

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग नगरपरिषदेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूकीसाठी बुधवारी (दि. ८) प्रभागांचे आरक्षण निश्चित करण्यात आले. १० जाग महिलांसाठी राखीव झाल्या आहेत. यातील ४ जागा सार्वधारण महिलांसाठी, ३ जागा नागरिकाचा मागासप्रर्गातील महिलांसाठी, अनुसूचित जमातींच्या महिलांसाठी २ तर अनुसूचित जातीच्या महिलांसाठी १ जागा राखीव झाली आहे.

नगरपरिषदांच्या निवडणुकीसाठी प्रशासन सज्ञ झाले आहे. नगराध्यक्षपदाची आरक्षण सोडत मुबईत पार पडली. प्रभागांच्या आरक्षणाची सोडत बुधवारी काढण्यात आली. अलिबाग नगरपरिषदेच्या प्रभागांच्या आरक्षणासाठी बुधवारी अलिबाग नगरपरिषदेच्या सभागृहात सोडत आकढण्यात आली. अलिबाग प्रांताधिकारी मुकेश चव्हाणा यांनी पिठासीन अधिकारी म्हणून काम पाहिले. अलिबाग नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सागर साळूंखे यांनी त्यांना सहकार्य केले.

यावेळी राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अलिबाग नगरपरिषदेचे १० प्रभाग असून प्रत्येक प्रभागातून २ सदस्य निवडून येणार आहेत. अलिबाग नगरपरिषदेत एकणू २० सदस्य निवडून येतील त्यातील ५० टक्के म्हणजेच १० जागा महिलांसाठी राखीव झाल्या आहेत.



## सहा वर्षांच्या विवानचा विश्वविक्रम

### अवघ्या सहा मिनिटांत १९५ देशांचे ध्वज ओळखले

**नवी मुंबई : बातमीदार**




नवी मुंबईच्या विवान अग्रवाल या सहा वर्षाच्या चिमुकल्याने अवघ्या सहा मिनिटे १६ सेकंदात जगातील १९५ देशांचे ध्वज अचूक ओळखून जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. विवानच्या या विक्रमाची नोंद इन्जिनियस चार्म वर्ल्ड रेकॉर्ड्स, एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये झाली आहे. इतक्या लहान वयात हा विक्रम करणारा तो देशातील सर्वात लहान विजेता ठरला आहे. चिमुकल्या विवानच्या विश्वविक्रमाची इतक्या कमी वयात नोंद झाल्याने त्याच्या तिक्ष्ण बुद्धिमत्तेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

अव्हालॉन हाइट्स इंटरनॅशनल स्कूलमध्ये इयत्ता २ मध्ये शिकणारा हा बाल विजेता लॅपटॉपच्या स्क्रीनवर दाखवण्यात आलेल्या ध्वजांची झटपट ओळख करीत त्यांच्या देशांची नावे अचूक सांगत गेला, आणि पाहता पाहता जगातील सर्व देशांवर आपला ज्ञानध्वज फडकावला! या विलक्षण कामगिरीला ऑल इंडिया स्पोर्ट्स अँड रिक्रिएशनल ॲक्टिव्हिटीज क्लबचे अध्यक्ष आनंद राजेन्द्रन यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकृत मान्यता मिळाली आहे.

विवानच्या नावाची नोंद इन्जिनियस चार्म वर्ल्ड रेकॉर्ड्स, एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये झाली असून, इतक्या लहान वयात हा विक्रम करणारा तो देशातील सर्वात लहान विजेता ठरला आहे.

विवानच्या या बुद्धिमत्तेच्या झळाळीमागे, त्याची जिज्ञासू वृत्ती, तीक्ष्ण स्मरणशक्ती आणि शिकण्याची अखंड ओढ आहे. जगातील भौगोलिक विविधतेबद्दल त्याची आवड पाहता शिक्षकांनी त्याला लहानसा ग्लोबल सिटिझन असे नाव दिले आहे.

## जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाच्या दि.२३ सप्टेंबर २०२५ आदेशान्वये जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानुसार पुढीलप्रमाणे सूचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे, दि.८ ऑक्टोबर २०२५, संबंधित प्राधिकारी तहसिलदार. नागरिकांकडून प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना स्विकारणे, दि.८ ऑक्टोबर ते दि.१४ ऑक्टोबर २०२५, संबंधित प्राधिकारी तहसिलदार. निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय मतदार याद्या अंतिम व अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे, दि.२७ ऑक्टोबर २०२५, संबंधित प्राधिकारी तहसिलदार. मतदान केंद्राची व मतदान केंद्र निहाय यादी प्रसिध्द करणे, दि.२७ ऑक्टोबर २०२५, संबंधित प्राधिकारी तहसिलदार.

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकासाठी निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय प्रारुप मतदार यादी https://raigad.gov.in, या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे, याबाबत नागरिकांनी नोंद घ्यावी, असे उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) डॉ. रवींद्र शेळके यांनी कळविले आहे.

## मांदाड खाडीवरील पुलामुळे पर्यटनाला चालना

**तळा : प्रतिनिधी**



तळा तालुक्यातील मांदाड पुल हे आता पर्यटकांचे आकर्षण बनत असून सहा तालुक्यांना जोडणारा पुल आहे.त्यामधे तळा,मुरूड ,रोहा,म्हसळा,श्रीवर्धन,माणगाव अशा या तालुक्यांना जोडणारा पुल असून या पुलामुळे तळ्यातील कुडेलेणी,तळगड कील्ला,मुरूड समुद्रकिनारा व जंजिरा किल्ला,दिवेआगर, हरिहरेश्वर, श्रीवर्धन समुद्रकीनारा असी ठिकाणे एका जवळच्या मार्गावरून सहजगत्या पर्यटकांना पहाता येत आहेत.त्याचबरोबर हि ठिकाणे पहात असताना हे पर्यटक मांदाड पुलावरती उतरून येथील खाडीचा व निसर्गाचा अनुभव घेऊन सायंकाळी सूर्यास्तावेळी थांबून हा आनंद घेत असतात.या ठिकाणाला आता पर्यटकांची चांगलीच पसंती मिळत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

या मांदाड खाडीवरील पुलालाही एक इतिहास आहे. त्यावेळचे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री बॅ.ए.आर.अंतुले यांच्या कल्पनेतून दूरदृष्टी ठेवून जिल्ह्यात मुरूड–मांदाड–कुडे–ताम्हाणे–मजगाव–तळा–रोहा–मुरूड–म्हसळा व श्रीवर्धन –माणगाव असे सहा तालुके जवळ आले असून तळा हे मध्यवर्ती ठिकाण निर्माण झाले आहे.या पुलाची लांबी अंदाजे ५७३.७५ मीटर व पुलाची रुंदी ९.४५ मीटर असून उंची १०.४० मीटर आहे.या पुलाच्या कामासाठी एकूण खर्च १२१०००० लक्ष आला होता.त्यावेळच्या एवढ्या मोठ्या पुलाचे भूमिपूजन ३ मार्च १९९६ मध्ये तत्कालीन सा.बा.मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले होते.तर उद्घाटन १२ एप्रिल २००० मध्ये सां.बा.मंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते आ.सुनिल तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते.त्यावेळी आर.सी.बॉक्स गर्डरचा ३८.२५ मीटरचा गाळा हा प्रथमच महाराष्ट्रात उपयोगी आणला होता.

या पुलावरून आता एस.टी.च्या फेऱ्या मुरुड – म्हसळा,मुरूड – तळा,म्हसळा–तळा,अशा फेऱ्या वाढविण्यात याव्यात अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

## तरुणाच्या मृत्यूप्रकरणी साई लीला रिसॉर्टच्या मालकावर अखेर गुन्हा दाखल

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील भालिवडी परिसरातील साई लीला रिसॉर्ट येथे फिरायला आलेल्या नालासोपाऱ्यातील तरुणाचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाल्याची घटना २७ जून रोजी घडली होती. तब्बल तीन महिन्यांच्या विलंबानंतर अखेर रिसॉर्टमालक गुरू तोरसे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कवीन पारकर हा आपल्या सहा मित्र–मैत्रिणींसह विकेंडला मौजमजा करण्यासाठी कर्जत येथे आला होता. सायंकाळी रिसॉर्टच्या स्विमिंग पूलजवळ असलेल्या लोखंडी झोपाळ्याला त्याने हात लावताच त्याला प्रचंड विजेचा झटका बसला. मित्रांनी घाबरून त्याला तात्काळ रायगड हॉस्पिटल, डिक्सळ येथे दाखल केले, मात्र डॉक्टरांनी कवीनला मृत घोषित केले. घटनेनंतर रिसॉर्टमालक गुरू तोरसे यांनी सुरुवातीला जबाबदारी नाकारत ही मुले दारूच्या नशेत होती, असा दावा केला. परंतु प्रत्यक्ष घटनास्थळी असुरक्षित विद्युत जोडणी असल्याचे उघड झाले. लोखंडी पाळण्याला चुकीच्या पद्धतीने केलेली वायरिंग यामुळेच विजेचा प्रवाह थेट त्या पाळण्यात उतरला आणि कवीनचा मृत्यू झाला, हे पोलिस तपासात आता स्पष्ट झाल्याने अखेर तीन महिन्यांनी कर्जत पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला.या प्रकरणाचा अधिक तपास कर्जत पोलिस निरीक्षक मनीषा लटपटे या करत आहेत.

## दामत गावात गोवंशीय जनावराची कत्तल; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**नेरळ :** नेरळ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दामत गावात गोमांस विक्रीसाठी गोवंशीय जातीच्या दोन जनावराची कत्तल केल्याचा प्रकार उघडकीस आला असून, पोलिसांनी तिघा आरोपींना रंगेहात पकडले आहे. ही घटना दि. ७ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री साडेआठच्या सुमारास घडली.

फुरकान परवेझ नजे (वय २०), सलमान खुर्शीद नजे (वय २८) आणि अखिल मुस्ताक नजे (वय ३४) हे तिघेही दामत गावातील असून, त्यांनी घराच्या मागील गोठ्यात बांधलेल्या गोवंशाची कत्तल केली. या प्रकाराची माहिती नेरळ पोलिस ठाण्याचे अधिकारी शिवाजी ढवळे यांना मिळताच त्यांनी तत्काळ पोलिस पथकासह घटनास्थळी धाड टाकली. यादरम्यान पोलिसांनी आरोपींना प्रत्यक्ष कृतीदरम्यान रंगेहात पकडण्यात यश मिळवले.

या प्रकरणी आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास नेरळ पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक एस. डी. किसवे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई



## * वाहतूक नियमांचे उल्लंघन भोवले
## * महिनाभरात ७१ हजार वाहनांना दंड

**पनवेल : वार्ताहर**

वाहनचालकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे, यासाठी रॅली, शाळा, महाविद्यालयात चर्चासत्रे, रस्ता सुरक्षेतून जनजागृती केली जाते. असे असतानादेखील नियमांचे उल्लंघन होत असल्याने महिनाभरात ७१ हजार ६५१ जणांवर कारवाई केली आहे.

पनवेलसह नवी मुंबई, उरण परिसरात मोठ्या प्रमाणात वाहनांच्या संख्येत वाढ होत आहे. वाढत्या वाहनांमुळे आणि वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करण्याचे प्रमाणही वाढले आहे. त्यामळे अशा वाहनांवर वाहतूक पोलिसांकडून कारवाई केली जात आहे. वाहतूक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शहरी भागात दुचाकीवरून तीन ते चार सीट प्रवास करणे, रिक्षांमधून पुढच्या सीटवर प्रवासी बसवणे, विद्यार्थी वाहनातून विद्यार्थ्यांना कोंबणे, हेल्मेट परिधान न करणे, सिग्नल यंत्रणेकडे दुर्लक्ष, सीट बेल्टचा वापर न करणे, विनापरवाना वाहन चालविणे याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

खारघरची लोकसंख्या पाच लाखांहून अधिक आहे. दरवर्षी शहरात वाहनांच्या संख्येत वाढ झाली आहे, मात्र वाहतूक पोलिस चौकीत वाहतूक पोलीस संख्या बळ कमी असताना ५,१२८ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली.

# मोहोपाडा एमआयडीसी रस्त्याच्या मोरीला भगदाड

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील जनता विद्यालय व एचडीएफसी बँकेकडे जाणाऱ्या रस्त्याला (म्हणजेच मोहोपाडा एमआयडीसीकडे जाणारा रस्ता) मधोमध भले मोठे भगदाड पडल्याने प्रवाशांसह नागरिकांना आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो.

या परिसरात जनता विद्यालय व ज्युनिअर कॉलेज तसेच बॅक ऑफ इंडिया, एचडीएफसी बँकांचे कार्यालय, गॅस एजन्सी छोट्या-मोठ्या कंपन्या, अनेक गॅरेज व इतर संकुलन असल्याने या रस्त्यावर नेहमी वर्दळ चालू असते. शिवाय रस्त्यालगत विद्यार्थी व बेकायदेशीरपणे लोडिंग वाहने रस्त्याच्या एका बाजूला पार्क केली जातात. या रस्त्यावरून अवजड वाहनामुळे एमआयडीसी रस्त्याची दुर्दशा झाली आहे. व रस्त्याच्या मधोमध भगदाड पडले आहे.

यातच एका बाजूला वाहन पार्क केल्यामुळे पादचाऱ्यांना चालण्यासाठी रस्ता अपुरा पडून अपघात होण्याचा धोका संभवतो तसेच मधोमध पडलेल्या भगदाडामुळे पाय त्यात अडकून जायबंदी व जीवितहानी होऊ शकते. यासाठी एमआयडीसी प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी, अशी सर्व स्तरातून मागणी नागरिकांतून होत आहे.

**अपघाताची शक्यता**



## निवडक

### वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल :** पनवेल-उरण मार्गावर करंजाडे येथे अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार चिन्मय पाटील (वय २२) याचा मृत्यू झाला, तर त्याचा मित्र निर्भय भगत (वय २१) गंभीर जखमी झाला आहे. चिन्मय आणि निर्भय हे दोघे दुचाकीवरून पनवेल उरण रोडवरून जात असताना अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिली. अपघातानंतर दोघांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान चिन्मयचा मृत्यू झाला. पनवेल शहर पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरोधात गुन्हा दाखल केला असून, त्याचा शोध सुरू आहे.

### मूर्तीची नासधूस करणारा अटकेत

**पनवेल :** तालुक्यातील डोलघर गावातील भवानीमातेच्या मूर्तीची नासधूस करण्याचा प्रयत्न घडला असून या प्रकरणात पनवेल तालुका पोलिसांनी एका तरुणाला अटक केली आहे. डोलघर गावात राहणारा आरोपी आदेश खोत मंदिरामध्ये घुसला होता. त्याने भवानी मातेच्या मूर्तीची नासधूस करण्याचा प्रयत्न केला. मूर्तीच्या तोंडावरील भाग, तोंडाच्या शेंदुराचा लेप निघुन अपवित्र केले. या प्रकारामुळे ग्रामस्थांच्या धार्मिक भावना दुखावल्याने तक्रार करण्यात आली. या वेळी पोलिसांनी परिस्थितीचा आढावा घेताना ग्रामस्थांना शांत केले.



**पनवेल : खासदार श्रीरंग बारणे यांनी नवनिर्वाचित शिवसेना ग्राहक तक्रार निवारण कक्षाचे तालुका प्रमुख अंबादास वाघ पाटील यांचे पनवेल येथील कार्यालयात अभिनंदन केले. या वेळी शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, उरण विधानसभा प्रमुख अतुल भगत, रघुनाथ पाटील आदी उपस्थित होते.**



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांचे सुपुत्र अपूर्व ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे स्वीय सहाय्यक दत्ता कुऱ्हाडे, अमित जाधव, राजू झांबरे, राजेश सकटे, शरद ढोमे यांनी शुभेच्छा दिल्या.**

# पनवेल येथील महाविद्यालयांमध्ये मराठी भाषा प्रदर्शन, निबंध लेखन स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अभिजात मराठी भाषा दिवस व अभिजात मराठी भाषा सप्ताह राज्यात दिनांक ३ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर या दरम्यान साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने पनवेल पालिकेच्या वतीने मराठी भाषेविषयी माहितीपर प्रदर्शनाचे आयोजन पिल्लई कॉलेज, महापालिका शाळा नंबर ५,६, एमजीएम महाविद्यालय येथे करण्यात केले आहे. तसेच पिल्लई कॉलेज, एमजीएम महाविद्यालय कामोठे येथे निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.



महापालिकेच्या वतीने अभिजात मराठी भाषा संवर्धन सप्ताह अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन महापालिका क्षेत्रात करण्यात आले आहे. या अंतर्गत आज मराठी भाषेविषयी माहितीपर प्रदर्शनाचे आयोजन आज पिल्लई कॉलेज, महापालिका शाळा नंबर ५,६, एमजीएम महाविद्यालय येथे करण्यात आले. तसेच पिल्लई कॉलेज, एमजीएम महाविद्यालय कामोठे येथे निबंध स्पर्धे चे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनास व निबंध स्पर्धेस विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला.

अभिजात मराठी भाषा सप्ताह अंतर्गत गुरूवारी (दि.९) दुर्मीळ ग्रंथांचे प्रदर्शन लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयामध्ये करण्यात येणार आहे. पनवेल महापालिका व के.गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने दुपारी १२ ते ६ यावेळेत होणाऱ्या या प्रदर्शनास महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट द्यावी, असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# पनवेल मनपाच्या अभय योजनेत १५ ऑक्टोबरपर्यंत ७५ टक्के सुट

## कर-मित्र चॅटबॉटची सुविधा उपलब्ध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत करदात्यांना दिलासा देण्यासाठी 'अभय योजना' राबविण्यात येत आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार १५ ऑक्टोबरपर्यंत शास्तीवरती ७५ टक्के सुट देण्यात आली आहे. यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. या अभय योजनेचा मालमत्ताधारकांनी लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. अभय योजनेंतर्गत आत्तापर्यंत सवलतीसह ५६६ कोटींचा कर पालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे.

याआधी महापालिकेने करदात्यांना शास्तीमध्ये तब्बल ९० टक्के सवलत होती. त्यानंतर आता १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत मालमत्ता कर भरणाऱ्यांना ७५ टक्के शास्ती माफी मिळणार आहे. महापालिकेकडून नागरिकांना विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी डिजिटल व्यवहाराला प्रोत्साहन देण्यात आले आहे.

करदात्यांनी ई-बिल स्वीकारणे, डिजिटल पद्धतीने कर भरणे यामुळे थेट २% सवलत मिळू शकते. तसेच ऊर्जा बचत करणारे सौर पॅनल, शेड नेट, वॉटर हार्वे स्टिंग अशा उपाययोजना केल्यास करामध्ये २% सवलत दिली जाणार आहे. याशिवाय घनकचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट करणाऱ्या सोसायट्यांना नियमानुसार करात २ टक्के सवलत मिळणार आहे.

कर भरण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी महापालिकेचे panvelmc.org हे संकेतस्थळ तसेच PMC TAX APP आणि Panvel Connect App उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामुळे करदात्यांना घरबसल्या ऑनलाईन कर भरण्याची सुविधा मिळत आहे. महापालिकेच्या वतीने उपायुक्त स्वरूप खारगे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, ही अंतिम मुदतवाढ लक्षात घेऊन दिलेल्या शास्तीमाफी व सवलतींचा लाभ घ्यावा.

**कर-मित्र चॅटबॉटची सेवा सुरू**

नागरिकांना अधिक सोयीस्कर, वेगवान आणि पारदर्शक सेवा देण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने 'कर-मित्र' चॅटबॉट सेवा सुरू केली आहे. हा अत्याधुनिक चॅटबॉट मालमत्ता करदात्यांना घरबसल्या त्वरित माहिती, मार्गदर्शन आणि ऑनलाइन मदत पुरवितो आहे.

**या सेवा उपलब्ध होतील**

मालमत्ता कराची थकबाकी त्वरित जाणून घेणे. आपल्या मोबाईल किंवा संगणकावरून थेट कर भरता येणे. बिल, पावती व कर गणनेबाबत शंका निरसन. योजना, सवलत आणि अंतिम तारखांबाबत अद्ययावत माहिती. अधिक मदतीसाठी नागरिकांनी पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत वेबसाइटवरील 'कर-मित्र' चॅटबॉटचा वापर करावा.

**आतापर्यंत मालमत्ता कर भरलेल्या मालमत्ता :** ९५ हजार ७८ अभय योजनेचे लाभार्थी : ६० हजार २१३शास्ती माफ झालेली रक्कम : ११७ कोटी

# उरणच्या पौदार प्रेप शाळेत विविध उपक्रम

**उरण : बातमीदार**



पौदार प्रेप या आंतरराष्ट्रीय शाळेत देशव्यापी उपक्रम 'इंटेलिजन्स इन हार्मनी, एक्सलन्स इन ॲक्शन' हा उपक्रम राबविला गेला असून ज्यामध्ये संपूर्ण भारतातील १८,००० हून अधिक मुलांचा उत्साही सहभाग दिसून आला.

या वर्षीची थीम 'शिक्षणाचे रत्न आणि जीवन कौशल्ये जोपासणे' यावर केंद्रित होती. या कार्यक्रमाचे एक वैशिष्ट्य म्हणजे सिग्नेचर पेन्सिल सेरेमनी, जो दसऱ्याच्या परंपरेने प्रेरित होऊन ज्ञानाच्या शक्तीचे प्रतीक म्हणून पेन्सिल भेट देण्यात आली.

द्रोणागिरी नोड व उरणच्या पौदार प्रेप इंटरनॅशनल स्कुलच्या सेंटर हेड अक्षता गायकवाड, उरणचे सेंटर हेड अक्षता गायकवाड, राजश्री तोगरे, अंकिता कोळी, ममता यादव, स्नेहा फर्नांडिस, लेखा मयेकर, प्रतिभा कोळी, नंदा सकपाळ, उर्मिला मोरे, सिल्व्हिया डिसोजा, मृण्मयी लोकेश, अफरोज तांबोळी आदींनी विशेष मेहनत घेतली.

# एमएनएम विद्यालयात विद्यार्थी पदग्रहण समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथे शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांच्या अध्यक्षतेखाली शैक्षणिक वर्ष २०२५/२६ विद्यार्थी पदग्रहण सोहळा उत्साहवर्धक वातावरणात साजरा करण्यात आला.

शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर सरस्वती मातेला वंदन करत दीपप्रज्वलन केले. दरम्यान, मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी नवनिर्वाचित विद्यार्थ्यांच्या शालेय समितीच्या सर्व विद्यार्थी पदाधिकाऱ्यांना पदग्रहणाची शपथ दिली. तसेच सर्व विद्यार्थी पदाधिकाऱ्यांना बिल्ला म्हणजे सदस्यत्वाची ओळख व पटका (कापडी पट्टा) परिधान करत विशेष सन्मान केला. विद्यार्थ्यांनी या वेळी नेटके शिस्तबद्ध संचालन व लेझीम पथकाने सुरेख प्रदर्शन केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर विद्यार्थी शिष्ट मंडळाच्या सर्व विद्यार्थ्यांना संबोधित करताना त्यांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या, शिस्तीचे पालन, यांची ओळख करून देत शालेय प्रगतीसाठी सर्व विद्यार्थी शिष्टमंडळातील पदाधिकाऱ्यांनी शालेय तसेच सहशालेय उपक्रमात भाग घेत शालेय प्रगतीचा आलेख उंच व्हावा असे नमूद केले. वरील पदग्रहण समारंभाला शाळेच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक अरुण जोशी, ज्येष्ठ शिक्षिका स्वाती देशमुख यांनी पदग्रहण केलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

सूत्रसंचालन अविनाश कजबजे व जयश्री देशमुख यांनी केले. कार्यक्रमासाठी क्रीडाशिक्षक वामन कुऱ्हाडे, क्रीडा शिक्षिका वर्षा नलावडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांची आयटीएमला भेट

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या बारावी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी ६ ऑक्टोंबर २०२५ रोजी आयटीएम नेरुळ येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना हॉटेल व्यवस्थापन क्षेत्रातील व्यवहारिक ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव मिळवून देणे हा होता.

सहली दरम्यान विद्यार्थ्यांनी हॉटेल व्यवस्थापनातील विविध विभागांचा – जसे की फूड प्रॉडक्शन, हाऊसकीपिंग, फ्रंट ऑफिस व फूड अँड बेव्हरेज सर्व्हिस – प्रत्यक्ष अभ्यास केला. तज्ञ प्राध्यापक व प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच या उद्योगातील कार्यपध्दतीची सविस्तर माहिती दिली.

या शैक्षणिक उपक्रमातून विद्यार्थ्यांना हॉटेल व्यवस्थापन क्षेत्रातील करिअरच्या संधीबाबत प्रेरणा मिळाली. या सहलीचे आयोजन केल्या बद्दल सर्व विद्यार्थ्यांनी प्राचार्या निशा नायर यांचे आभार मानले.



# बीसीटी विधी महाविद्यालयातर्फे विविध उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय स्वच्छता अभियानाच्या 'एक दिवस, एक तास, एक साथ' या संकल्पनेशी सुसंगत राहून, भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयाच्या एनएसएस युनिटने पनवेल महापालिकेच्या वतीने शिव मंदिर तलाव, खांदा कॉलनी येथे आयोजित स्वच्छता अभियानामध्ये सहभाग नोंदविला.



ही मोहीम पंडित दिनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्ताने आयोजित करण्यात आली होती. या उपक्रमाचा उद्देश परिसर स्वच्छ ठेवणे, पर्यावरणाचे संवर्धन करणे आणि समाजामध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती घडवून आणणे हा होता. कार्यक्रमाचे मार्गदर्शन प्राचार्य डॉ. सानवी देशमुख आणि एनएसएस अधिकारी सहाय्यक प्रा. सूरज भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

एनएसएस स्वयंसेवकांनी उत्साहाने विविध स्वच्छता उपक्रमांमध्ये सहभाग घेतला. तलाव परिसराची तसेच सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करून कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली. स्वयंसेवकांनी तलाव परिसरातील बागा व हिरवळीची देखभाल केली, ज्यामुळे परिसर स्वच्छ, आरोग्यदायी आणि आकर्षक बनविण्यात मदत झाली.

## संपादकीय

# स्वप्नपूर्तीचा दिवस

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे मुंबईला दुसरा विमानतळ मिळाला असून त्यामुळे मुंबईच्या विमानतळावरील ताण तर कमी होईलच, परंतु देशातील सर्वात आधुनिक अशा या नव्या विमानतळामुळे स्थानिकांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगार व व्यवसायाच्या संधी उपलब्ध होतील तसेच महाराष्ट्राच्या व देशाच्या विकासालाही वेग मिळणार आहे अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी या विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन करताना दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटल्याप्रमाणे बुधवारचा दिवस हा स्वप्नपूर्तीचाच दिवस होता.

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळात विकसित भारताची झलक दिसत असून या विमानतळामुळे मुंबईची आशियातील सर्वात मोठा कनेक्टिव्हिटी हब अशी ओळख प्रस्थापित होईल असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन करताना बुधवारी काढले. विमानतळाचा पहिला टप्पा व पहिला रनवे पूर्ण झाला असून येत्या डिसेंबरपासून या विमानतळावरून व्यावसायिक उड्डाणे सुरू होण्याची शक्यता आहे. विमानतळाखेरीज मुंबईतील भुयारी मेट्रोच्या अंतिम टप्प्याचे उद्घाटनही पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते यावेळी झाले. उद्घाटनप्रसंगी पंतप्रधान मोदी यांनी लोकनेते स्वर्गीय दि. बा. पाटील यांचे आवर्जून स्मरण करीत त्यांचे संपूर्ण जीवन प्रेरणादायी आहे अशा शब्दांत त्यांच्या कामाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. नवी मुंबई विमानतळाचा आकार कमळाच्या फुलाप्रमाणे असून याचा अर्थ ते संस्कृती व समृद्धीचे प्रतीक आहे या पंतप्रधानांच्या उद्गारांतही स्थानिक जनतेच्या आशाआकांक्षांचे प्रतिबिंब दिसते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तर आजचा दिवस हा स्वप्नपूर्तीचा दिवस आहे असा अत्यंत समर्पक उल्लेख आपल्या भाषणात केला. रायगड जिल्ह्यातील स्थानिकांसाठी खरोखरीच हा स्वप्नपूर्तीचाच दिवस म्हटला पाहिजे कारण रोजगार व व्यवसायाच्या अनेक संधी या आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे स्थानिक स्तरावर उपलब्ध होणार आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा प्रस्ताव पंतप्रधानांकडे पाठवण्यात आला असून त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे मुख्यमंत्री फडवीस यांनी अलीकडेच म्हटले होते. लवकरच त्यासंदर्भातील घोषणा होईल असे सांगितले जाते. उद्घाटनाच्या कार्यक्रमाला दिवंगत नेते दि. बा. पाटील यांच्या कुटुंबियांना निमंत्रित करण्यात आले होते व त्यांचे संपूर्ण कुटुंब कार्यक्रमास उपस्थित राहिले. या विमानतळामुळे महाराष्ट्रातील शेतकरी व मच्छिमारांची उत्पादने वेगाने जागतिक बाजारपेठांमध्ये पोहोचतील. विमानतळामुळे राज्यात गुंतवणूक येईल, नवे उद्योग येतील असे पंतप्रधानांनी म्हटले असून अतिशय आधुनिक दर्जाच्या या विमानतळामुळे समृद्धी येईल हे खरेच आहे. विमानतळामुळे महाराष्ट्राचा जीडीपी १ टक्क्याने वाढेल असा अंदाज मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला असून हे अवघे चित्र स्थानिकांसाठी आशाआकांक्षा उंचावणारेच आहे. अदानी समूह आणि सिडको यांनी मिळून हा विमानतळ उभारला असून विमानतळाचे पुढील टप्पेही या दोन संस्थांमार्फतच पूर्ण होतील. आव्हानात्मक असलेल्या या विमानतळाची उभारणी खरोखरीच अगदी नजरेत भरण्यासारखी झाली आहे. २०१८ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याच हस्ते या विमानतळाची पायाभरणी झाली होती, तर २०२२ मध्ये स्वर्गीय दि. बा. पाटील यांचे नाव या विमानतळास देण्याच्या प्रस्तावास राज्याच्या मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली. गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात येथे लष्करी विमानाचे यशस्वी लँडिंग झाले होते. पहिल्या टप्प्यात विमानतळावर एक टर्मिनल, एक रनवे, दहा बस गेट आणि २९ एअरो ब्रिजेस बांधण्यात आले आहेत.**

# अतिवृष्टी, महापूर, भूस्खलन नैसर्गिक आपत्ती





**खबरबात**
**शैलेश पालकर**

२३ जुलै १९८९च्या पावसाळ्यामध्ये सुकेळी खिंडीच्या पलिकडे अंबा नदीच्या पुरामध्ये जांभूळपाडा हे गांव वाहून गेल्याची माहिती मिळाली. तब्बल आठ दिवसांनंतर तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी जांभूळपाडयाची पाहणी केली आणि टाटा सोशल सायन्सेसचे विद्यार्थी परिसराचा अभ्यास करायला आल्याचे समजले. यानंतर जांभूळपाडयाच्या पुराबद्दल अधिकाधिक माहिती वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द होऊ लागली.

साधारणपणे अठराशे लोकवस्तीच्या जांभूळपाडयामध्ये ११७ जण वाहून गेले आणि ११५ लोकांचे मृतदेह आढळून आले. या लोकांच्या पुनर्वसनाचे प्रयत्न करण्याचा आपत्ती निवारण कायदा नसल्याने प्रयत्न झाले नाहीत आणि मृतांना सानुग्रह अनुदानही दिले गेले नाही. याच काळात गोरेगांव कोऑपरेटिव्ह अर्बन बँकेने गरजूंना विनाकागदपत्र कर्ज देऊन संसार उभे करण्याचा प्रयत्न राजकीय इच्छाशक्तीला भूलून केला आणि त्या कर्जांचा परतावा न झाल्याने बँक डबघाईस गेली.

पुढे जांभूळपाडयाचा महापूर नैसर्गिक आपत्ती हे जीवघेण्या आपत्तीचे प्रमाण ठरले असताना पाचच वर्षांनंतर २८ जून १९९४ साली वरंध घाटातील पारमाची येथील भूस्खलनाची घटना आणि किमान ३५ हून अधिक लोक दरडीखाली समाधी मिळाल्याचे ऐकण्यास मिळाले. यापैकी १३ जणांचे मृतदेह आढळून आले. वरंध घाटात माझेरीपासून पुढे कावळा किल्ल्याजवळच्या पारमाची येथील ही घटना होती. त्याकाळी जेसीबी आणि अन्य यंत्रणा नसल्याने भूस्खलनामध्ये पारमाची गांव आणि बुध्दवाडीतील घरांवर दरड कोसळल्याचे दिसले. रडणारी महिला भगिनी वृध्द मंडळी दिसली. काही पोलीस आणि आणि काही पुणे व मुंबईस्थित चाकरमानी मंडळी दिसून आली. दु:खाचा डोंगर कोसळला आणि मातीचा ढिगारा कोसळला. एवढेच रडवेले सूर आळवले जात होते.

महाड तालुक्यात पारमाचीच्या घटनेनंतरही भूस्खलनाच्या जीवघेण्या दूर्घटना झाल्या. या पारमाचीचे पुनर्वसन करण्यासाठी तब्बल ३१ वर्षांचा कालावधी लोटला. गेल्या वर्षी २०२४ मध्ये ह.भ.प. गुरूवर्य फणसे महाराजांच्या साक्षीने महाडचे मंत्री ना.भरतशेठ गोगावले यांनी शासनाकडून २२ एकर जमिन आणि १९ कोटी रूपये निधी मिळवून महाड एमआयडीसीतील विविध कंपन्यांच्या सीएसआर फंडातून गांवाच्या विकासासाठी आवाहन केले. तळियेचे पुनर्वसन अर्ध्यावर सोडल्यासारखे जाणवत असताना हा भूस्खलनानंतरचा ३१ वर्षांनंतरचा पुनर्वसनाचा प्रयोग आणि २००५ तसेच २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीतील भूस्खलनानंतर रखडलेल्या आणि अर्ध्यावर सोडलेल्या पुनर्वसनानंतर कोणताही पूर्णत्वाचा प्रयत्न होत नाही ही बाब केवळ संतापजनक आहे.

२५ व २६ जुलै २००५ रोजी पोलादपूर तालुक्यामध्ये अतिवृष्टीने हाहाकार माजविला. तालुक्यातील उत्तरवाहिनी सावित्री, चोळई, कामथी, घोडवनी आणि ढवळी नद्यांची पात्र तुडूंब भरून वाहताना काठावरील शेतजमीन अन् भाताची रोपेही सोबत वाहून नेत होती. २००५ च्या २५ अन् २६ जुलै या दोन दहा वर्षांपूर्वीच्या काळ दिवसांची आठवण ताजी होतेय. काय-काय घडले होते त्या दिवशी? महाड तालुक्यातील जुई, कोंडीवते, दासगांव, रोहन गावांत धरणीमातेच्या उदरात अनेक मानवी देह गाडले गेले तोच प्रकार पोलादपूर तालुक्यातील कोतवाल खुर्द, कोतवाल बुद्रुक आणि लोहारे पवारवाडीमध्येही झाला. आपत्तीनिवारणाच्या साधनांची कमतरता वाटेल इतपत महाडचा प्रसंग भीषण होता.त्यामुळेच पोलादपूर तालुक्यातील मनुष्यहानीच्या प्रसंगात गाडले गेलेले मृतदेह बाहेर काढण्यासाठी तसेच कशेडी घाटातील दरड हटविण्यासाठी कोणतीही तातडीची उपाययोजना होऊ न शकल्याने पोलादपूरचे जनजीवन तब्बल ११ दिवस ठप्प राहिले.

पोलादपूरचे वाचनालय इमारतीसह वाहून गेले. गंगामाता सभागृह वाहून गेले. सुंदरराव मोरे महाविद्यालय वाहून गेले. जुना महाबळेश्वर रस्ता खचला. सरकारी गोदामातील शेकडो टन धान्य भिजले. पोलादपूर शहरातील बाजारपेठेमध्ये पुराने छातीत धडधड वाढवली. गेल्या १०० वर्षांत असा पूर कधी कोणी पाहिला नव्हता...त्यावेळी ८२ वर्षांचे असलेले राम गुरूजी यांना घरातून बाहेर काढल्यानंतर त्यांनी सांगितले. वीजमंडळाच्या गोदामाची इमारत आणि शेजारची टपरीवजा हॉटेलची शेडही वाहून गेली. चित्रेंच्या घाटावरील तीन छोटी मंदिरेही फूटून वाहून गेली.

कोतवाल बुद्रुकमध्ये सारं सकपाळ कुटूंबच गाडलं गेलं. पैठणचा पूल वाहून गेला. कोतवाल खुर्दमध्येही तीनजण गाडली गेली. लोहारे पवारवाडीत जमीन दुभंगली अन् घर दुभंगून दोघे गाडले गेले. दोघे बचावले.कोंढवी भागामध्येही जमिनीला तडे गेले. घरामध्ये दरडी शिरल्या. कोतवाल खुर्दच्या एका घराच्या पोटमाळ्यावर आजही एक मोठी दरड स्थिरावलेली दिसून येत आहे.

आपत्ती निवारण कायदा २००७ निर्माण झाला पण सरकारी अधिकाऱ्यांना त्याची धास्ती दिसत नाही. २५ व २६ जुलै २००५ रोजी अतिवृष्टी, महापूर आणि भूस्खलनाच्या अस्मानी संकटानंतर महाड आणि पोलादपूर तालुक्यातील आपद्ग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी अनेक सेवाभावी संस्था पुढे सरसावल्या. महाड तालुक्यातील दासगांव वगळता कोंडीवते, रोहन, जुई व कुर्ले येथील आपद्ग्रस्तांचे पुनर्वसन झाले. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी महाड तालुक्यातील कोंडीवते, रोहन, जुई व कुर्ले येथील आपद्ग्रस्तांना पुनर्वसन घरकुलांचे वाटप करताना 'महाडचा पुनर्वसन पॅटर्न देशास आदर्शवत' असल्याचे गौरवोद्गार काढले होते.

कोंढवी येथे ७८ कुटूंबे दरडग्रस्त असताना याठिकाणी प्रत्येकी ५० लाख रूपये खर्चातून केवळ १५ घरकुलं उभारण्यात आली. कोंढवीतील एका घरकुलासाठी ३ लाख २० हजार ८७५ रूपये ९५ पैसे खर्च झाल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे म्हणणे आहे. कोतवाल खुर्द येथे निविदेची किंमत वाढल्यामुळे कोतवाल खुर्द येथील एका घरकुलासाठी ३ लाख ४५ हजार ७९० रूपये ७५ पैसे खर्च झाल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त झाली.

महाड तालुक्यातील सव-दासगांव येथे २५ जुलै २००५ चे दरडग्रस्त अद्याप आपल्या पुनर्वसनाची चातकाप्रमाणे वाट पाहात असल्याने महाड-पोलादपूर-माणगांवचे आमदार भरतशेठ गोगावले यांनी या प्रकरणी कपात सूचना केली असता यासंदर्भात गुजरात सरकारने दिलेल्या १० कोटी रूपयांच्या निधीची माहिती उजेडात आली आहे.

देवळे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील केवनाळे गावात दरड कोसळल्यानंतर त्यामध्ये दाभेकर तसेच त्यांच्या घरी पाहुणे म्हणून आलेले महादेव रामजी कदम यांच्या प्रेतांचा समावेश होता. या दुर्घटनेत प्रतिक्षा आणि साक्षी नारायण दाभेकर या जखमी झाल्याने पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. साखर सुतारवाडी येथील दरड कोसळण्याच्या दुर्घटनेत पाच सुतार कुटूंबियांचे शवविच्छेदन करण्यात आले.

महाड तालुक्यातील कुंभेशिवथर रस्त्याच्या विरूध्द बाजूला डोंगरामध्ये असलेल्या तळिये गावाकडे जाण्याचा रस्ता आहे. २१ व २२ जुलै २०२१ च्या अतिवृष्टी काळामध्ये झालेल्या भूस्खलनात मृतांची संख्या ८४ असून ५३ मृतदेह शोधण्यात आले तर उर्वरित ३१ बेपत्ता प्रेतांना मृत घोषित करण्यात आले. दरडीच्या ढिगाऱ्याखालून ५ जणांना जीवंत बाहेर काढण्यात आले. तत्कालीन महाविकास आघाडीसरकारमधील आमदार भरतशेठ गोगावले यांच्या महाड मतदार संघातील या तळिये दूर्घटनाग्रस्त गावात मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, विरोधीपक्ष नेते फडणवीस, केंद्रीय मंत्री नारायण राणे, गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड असे निर्णयक्षमता असलेले मंत्री आले.

माळीण भूस्खलन गावाच्या पुनर्वसनाप्रमाणे याठिकाणीही पुनर्वसन करण्यासंदर्भात तत्परता दाखविण्यात आली. ६८ कुटूंबांचे पुनर्वसन करण्याकामी कोकण म्हाडाने २०७ घरकुले बांधण्याचा प्रकल्प हाती घेऊन ६६ घरांचा ताबा कोंढाळकरवाडीला दिला. ७२ घरांचे काम प्रगतीपथावर असताना २७१ पैकी ४४ घरांसाठी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाकडून भूसंपादन करून जमीन उपलब्ध करून देण्यात आली नसल्याने धोकादायक क्षेत्रातील घरांचे काम रखडलेल्या कुटूंबियांना जीव मुठीत घेऊन जगावे लागत आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# तीन सेटिंगशिवाय इन्स्टावर फोटो, व्हिडीओ शेअर करू नका

अनेक जण दरदिवशी सोशल मीडियावर त्याच्या अकाउंटवरून फोटो किंवा व्हिडीओ शेअर करत असतात पण अनेकदा त्या फोटोंवर किंवा व्हिडीओवर मनाप्रमाणे लाइक्स, व्ह्यूज येत नाही. सध्या असाच एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. इन्स्टाग्रामवर फोटो किंवा व्हिडीओ शेअर करण्यापूर्वी तीन सेटिंग्ज करण्यास या व्हिडीओमध्ये सांगितले आहेत. त्या सेटिंग्ज कोणत्या आहेत हे आज आपण जाणून घेणार आहोत.



या तीन सेटिंग्ज केल्याशिवाय इन्स्टाग्रामवर फोटो किंवा व्हिडीओ पोस्ट करू नये.

१. सेटिंग्ज आणि अक्टिव्हिटीमध्ये जा. त्यानंतर क्रॉसपोस्टिंगवर क्लिक करा. त्यानंतर 'Recommend reels on Facebook' ऑन करा. त्यानंतर इन्स्टाग्रामवरील पोस्ट, स्टोरी आणि रील्स फेसबुकवर शेअर करण्याचे ऑप्शन ऑन करा.


२. मीडिया क्वालीटी या ऑप्शनवर क्लिक करा. त्यानंतर तुम्हाला तीन ऑप्शन दिसेल.त्यापैकी पहिले use less mobile data आणि तिसरे Disable HDR Video playback पर्याय ऑफ करा.

३. एडिट प्रोफाइलमध्ये जा आणि 'Show account suggestions on profile' हे सजेशन अकाउंट ऑप्शन ऑन करा.

officialpwnkumar या इन्स्टाग्राम अकाउंटवरुन हा व्हिडीओ शेअर करण्यात आला असून या व्हिडीओच्या कॅप्शनमध्ये लिहिलेय, या तीन सेटिंग्जशिवाय इन्स्टाग्रामवर फोटो किंवा व्हिडीओ कधीही शेअर करू नका.

या व्हिडीओवर अनेक युजर्सनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. एका युजरने लिहिलेय, खूप छान माहिती दिली, तर एका युजरने लिहिलेय, हे सेटिंग्ज केल्यानंतर मला मोठा बदल जाणवला. खूप खूप आभार आणखी एका युजरने लिहिलेय, धन्यवाद इतकी महत्त्वाची माहिती शेअर केल्याबद्दल. अनेक युजर्सनी चांगली माहिती शेअर केल्याबद्दल आभार व्यक्त केले आहे. पवन कुमार हा त्याच्या officialpwnkumar या इन्स्टाग्राम अकाउंटवरून नवनवीन माहिती, ट्रिक सांगतो. सोशल मीडियावर हजारो लोक त्याला फॉलो करतात. त्याच्या प्रत्येक पोस्टवर लाईक, कमेंट्चा वर्षाव करतात.

# संगीत रचनाकार, गायकनट गोविंदराव टेंबे



**निमित्त**


प्रख्यात हार्मोनियमवादक, संगीतरचनाकार, गायकनट व साहित्यिक गोविंदराव सदाशिवराव टेंबे यांचा आज स्मृतीदिन. त्यांचा जन्म ५ जून १८८१ रोजी सांगवडे (जि. कोल्हापूर) येथे झाला. त्यांच्या आईचे नाव अंबा. गोविंदरावांनी कोल्हापूर येथेच शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेतले व काही वर्षे सनदी वकिली केली. गायनाच्या कार्यक्रमात जाऊन त्यांना संवादिनी (हार्मोनियम) या वाद्याची आवड निर्माण झाली. प्रत्यक्ष या वाद्यवादनाचे रीतसर शिक्षण त्यांनी घेतले नव्हते, परंतु स्वप्रयत्नाने त्यांनी या वादनात प्रावीण्य मिळवले. गोविंदराव भास्करबुवा बखले यांच्या साथीला असायचे आणि बहुतेक वेळा संवादिनीचा एकपात्री प्रयोगही करायचे. ते बर्कतुल्ला सितारिये यांचे गंडाबंद शागीर्द होते.

१९११-१३ या काळात त्यांनी 'किर्लोस्कर नाटक मंडळी'त प्रमुख गायकनट म्हणून काम केले. पुढे १९१३-१५ या दरम्यान 'गंधर्व नाटक मंडळी'त सुरुवातीचे भागीदार व नट म्हणून त्यांनी काम केले. १९१७मध्ये त्यांनी स्वत:च्या 'शिवराज नाटक मंडळी' या संगीत नाटक मंडळीची स्थापना केली. यासाठी त्यांनी नवी नाटके लिहिली, पदे रचली आणि संगीतही दिले. 'धैर्यधर' (मानापमान), 'कच' (विद्याहरण), 'चारूदत्त' (मृच्छकटिक) या त्यांच्या काही प्रमुख गाजलेल्या भूमिका. त्यांनी मानपमान या नाटकास संगीतही दिले. १९३०च्या सुमारास त्यांनी चित्रपटसृष्टीमध्ये पदार्पण केले आणि प्रभात, इंपीरियल, ईस्ट इंडिया, मिनर्व्हा, नटराज इ. संस्थांच्या चित्रपटांमध्ये प्रमुख भूमिका केल्या तसेच संवादलेखन, गीतरचना व संगीतदिग्दर्शन या क्षेत्रांतही प्रशंसनीय कामगिरी केली. अयोध्येचा राजा या पहिल्या मराठी बोलपटात ते नायकाच्या प्रमुख भूमिकेत होते. या चित्रपटाचे संगीतदिग्दर्शनही त्यांनी केले होते. यांखेरीज त्यांनी अनेक नाटके लिहिली तसेच महाश्वेता, जयदेव, प्रतिमा इ. संगीतिका (ऑपेरा) लिहून त्या सादरही केल्या. १९३९मध्ये त्यांनी म्हैसूर संस्थानच्या युवराजांबरोबर यूरोपचा दौरा केला. तेथे त्यांना पोपच्या समोर कार्यक्रम करण्याची संधी मिळाली.

संवादिनी या साथीच्या वाद्याला टेंबे यांनी स्वतंत्र वाद्याची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. पेटीवर बोटे टाकण्याची त्यांची पद्धत अंत:करणाचा ठाव घेणारी होती. जयपूर घराण्याची तेढी, बिकट गायकी व अभिजात नाट्यसंगीत या दोहोंचे वादन ते सारख्याच कुशलतेने पेटीवर करीत. त्यांनी मराठी संगीताचा मानबिंदू अशा लक्षणगीतांची रचना केली. या लक्षणगीतांची ध्वनिमुद्रिकाही नंतर प्रकाशित करण्यात आली.

माझा संगीत-व्यासंग (१९३९), माझा जीवन विहार (आत्मचरित्र, १९४८), खाँसाहेब अल्लादियाखाँ यांचे चरित्र (१९५४), जीवनव्यासंग (१९५६) ही त्यांची महत्त्वाची ग्रंथनिर्मिती. टेंबे यांच्या ग्रंथांतून नाट्य व संगीताची दुनिया अतिशय हृद्यतेने रूपास आली आहे. भारत नाट्यसंमेलन (१९३३), मराठी रंगभूमी शतसांवत्सरिक उत्सव, नागपूर (१९४३), मराठी साहित्य परिषद, बडोदे आदींची अध्यक्षपदेही त्यांनी भूषविली. कोल्हापूरातील गायन समाज देवल क्लब या संस्थेशी त्यांचा निकटचा संबंध होता. ते या संस्थेचे काही काळ संचालकही होते. या संस्थेमध्ये त्यांच्या स्मरणार्थ गोविंदराव टेंबे रंगमंदिर उभारण्यात आलेले आहे. गोविंदरावांचे ९ ऑक्टोबर १९५५ रोजी दिल्ली येथे निधन झाले. **-सुधीर पोटे**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# पोट बिघडल्यानंतर काय खावे व काय खाऊ नये?

ठराविक अन्नपदार्थांमुळे तसेच खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयींमुळे सहसा पोट बिघडते. पोट बिघडल्यानंतर पोटाच्या विविध समस्या व पोटदुखीचा त्रास सहन करावा लागतोच, पण त्याचबरोबर आपण आवडते पदार्थ खाऊ शकत नाही आणि काही कालावधीसाठी चविष्ट नसलेले कंटाळवाणे अन्नपदार्थ खावे लागते. ज्यांचे सतत पोट बिघडते त्यांनी जेवण करावे की नाही, हा एक जुना प्रश्न आहे.खरंच पोट बिघडल्यानंतर जेवण करणे टाळणे फायदेशीर असते का? पोट बिघडल्यानंतर काय खावे आणि काय खाऊ नये याविषयी सर एचएन रिलायन्स फाऊंडेशन हॉस्पिटलच्या क्लिनिकल आहारतज्ज्ञ वेदिका प्रेमानी सांगतात, पोट बिघडल्यानंतर जेवण न केल्याने पोटात अन्नापेक्षा जास्त सिड तयार होऊ शकते, ज्यामुळे पोट फुगणे, सिडिटी, पोटात अस्वस्थता जाणवणे इत्यादी लक्षणे दिसू शकतात.



आहारतज्ज्ञ प्रेरणा सोलंकी याविषयी सांगतात, पोट बिघडल्यानंतर उपवास करावा की नाही किंवा जेवण करावे की नाही, हे पोट बिघडण्याचे कारण आणि त्याच्या तीव्रतेवर अवलंबून असते. त्या पुढे सांगतात, जर लक्षणे सौम्य असतील तर तुम्ही थोड्या प्रमाणात एका ठराविक वेळेनंतर जेवण करू शकता. सहज पचणारे अन्नपदार्थ आणि मसालेदार व फॅट नसलेले पदार्थ खाऊ शकता, पण जर लक्षणे गंभीर असतील तर पोटाला आराम द्या आणि जास्तीत जास्त पाणी पिण्याकडे लक्ष केंद्रित करा तसेच काही तास उपवास करा.

सोलंकी सांगतात की, जेव्हा तुमचे पोट बिघडते तेव्हा उपवास केल्यामुळे किंवा जेवण न केल्यामुळे तुमच्या पचनसंस्थेला आराम मिळतो, पण हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की, आपले यकृत आणि किडनी हे नैसर्गिकरित्या शरीरातून विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करतात; त्यासाठी उपवास करण्याची गरज नाही, पण काहीवेळा जेवण कमी केल्याने पोटाच्या समस्या दूर होऊ शकतात. पोट बिघडल्यानंतर तुम्ही उपवास केला तरी हायड्रेटेड राहणे खूप महत्त्वाचे आहे. पाणी, हर्बल चहा किंवा सूपसारखे द्रव्य पदार्थ प्यायल्याने शरीरात पाण्याची कमतरता भासत नाही. विशेषत: जेव्हा तुम्हाला उलट्या किंवा अतिसाराचा त्रास होत असेल तर शरीर हायड्रेटेड ठेवा.

दुग्धजन्य पदार्थ, सूप, फळांचा रस, भात यांसारख्या पदार्थांमुळे अतिसार, मळमळ दूर होते, याशिवाय उलट्यांचा त्रास कमी होतो, असे डॉ. प्रार्थना शाह सांगतात.

# रायगडात नगर परिषद प्रभाग सदस्य आरक्षण जाहीर

## कर्जत पालिकेत अनेकांचे मनसुबे उधळले

**कर्जत :** कर्जत नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदाचे आरक्षण जाहीर झाले. यावेळी इतर मागासवर्गीय महिला नगर परिषदेचा कारभार सांभाळणार आहे. आज नगरपरिषदेच्या प्रभागांच्या सदस्यांचे आरक्षण सोडतीने जाहीर झाले. आरक्षण जाहीर झाल्यानंतर अनेक जणांचे मनसुबे उधळले असल्याने त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट नाराजी दिसत होती.



रॉयल गार्डनच्या सभागृहात प्रभाग आरक्षण सोडतीचे आयोजन करण्यात आले होते. प्राधिकृत तथा उप जिल्हाधिकारी भारत वाघमारे यांच्या प्रमुख उपस्थितीत सोडतीस सुरुवात झाली. याप्रसंगी मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, कार्यालयीन अधिक्षक रवींद्र लाड, बहिरम बापू आदी उपस्थित होते. कर्जत नगरपरिषद हद्दीतील लोकसंख्या २०११ चे जनगणना नुसार २९६६३ असून दहा प्रभागातील नऊ प्रभागात प्रत्येकी दोन सदस्य आणि प्रभाग दहा मधून तीन सदस्य पालिकेवर निवडून दिले जाणार आहेत.

त्यानुसार तीन जागा अनुसूचित जाती असून त्यातील दोन जागा महिला राखीव तर अनुसूचित जमाती साठी असलेल्या एक जागेवर मागील निवडणुकीत महिला आरक्षण नसल्याने यांनिवडणुकीसाठी ती जागा महिला राखीव करण्यात आली आहे. तर सहा जागा नागरिकांचा मागास प्रवर्ग साठी राखीव असून त्यातील तीन जागा महिला राखीव आहेत. सर्वसाधारण अकरा जागा असून त्यातील सहा जागा महिला राखीव ठेवण्यात आल्या आहेत. अनुसूचित जाती आणि जमाती तसेच नागरिकांचा मागास प्रवर्ग गटातील महिला आरक्षणाची सोडतीसाठी विद्या विकास मंदिरच्या तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांच्या हस्ते चिठ्ठ्या काढण्यात आल्या.

याप्रसंगी माजी नगराध्यक्ष शरद लाड, माजी उपगराध्यक्ष उत्तम जाधव, उमेश गायकवाड, सुनील गोगटे, संतोष पाटील, सोमनाथ ठोंबरे, दीपक मोरे, संकेत भासे, केतन बेलोसे, अभिषेक सुर्वे, प्रदीप वायकर, दिनेश कडू, भानुदास पालकर, गणेश लाड, अजय पाल, संदीप करणूक, सोमनाथ पालकर, शरद हजारे, अनिल मोरे, किशोर कदम, अतुल कडू, मल्हारी माने, वैभव सुरावकर, ज्ञानेश्वर करणूक, दर्शन वायकर, रोहित ओसवाल, अशोक मोरे, राकेश देशमुख, राहुल गायकवाड, अशोक दिघे आदी उपस्थित होते.

आरक्षण ;– प्रभाग क्रमांक – १ ,अ – नागरिकांचा मागास प्रवर्ग ( महिला ) ब – सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक – २, अ – नागरिकांचा मागास प्रवर्ग ( महिला ), ब – सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक – ३ , अ –नागरिकांचा मागास प्रवर्ग ( महिला ), ब –सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक – ४, अ – अनुसूचित जाती ( महिला ), ब – सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक – ५ अ –अनुसूचित जमाती ( महिला ) ब – सर्वसाधारण प्रभाग क्रमांक – ६ अ – सर्वसाधारण ब सर्वसाधारण ( महिला ) प्रभाग क्रमांक – ७ अ – नागरिकांचा मागास प्रवर्ग ब – सर्वसाधारण ( महिला ) प्रभाग क्रमांक – ८ अ –अनुसूचित जाती ( महिला ) ब – सर्वसाधारण प्रभाग क्रमांक –९ अ – नागरिकांचा मागास प्रवर्ग ब – सर्वसाधारण ( महिला ) प्रभाग क्रमांक – १० अ – अनुसूचित जाती (महिला), ब – नागरिकांचा मागास प्रवर्ग, क – सर्वसाधारण ( महिला).

## पेण पालिकेत पुन्हा अवतरणार महिलाराज

**पेण :** पेण नगर परिषदेच्या १२ प्रभागामधील २४ जागांचे आरक्षण प्रांत अधिकारी प्रवीण पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आरक्षण सोडत विशेष सभेत पेण नगर परिषद मुख्याधिकारी जीवन पाटील, नगर अभियंता सुहास कांबळे यांचे प्रमुख उपस्थितीत नगरपालिका क्षेत्रातील नागरिक यांचे समक्ष आरक्षण सोडतीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला .

निवडणूक अधिकारी तथा प्रांत अधिकारी प्रवीण पवार यांनी आरक्षीत जागांच्या क्रमवारी नुसार विद्यार्थी वर्गाकडून चिठ्ठी काढून तो जाहीर केला.

या अगोदरच्या सोडतीत महिला खुला प्रवर्गासाठी राखीव जाहीर झाले असल्याने आज प्रमाणानुसार आरक्षण सोडतीकडे विशेष लक्ष लागले होते. पालिकेवर पुन्हा एकदा महिलांच्या हाती सत्तेची दोर येणार असल्याचे चित्र दिसून आले

जाहीर झालेल्या आरक्षण सोडती मधे एकुण १२प्रभागातील २४ जागामधे अनु. जाती सर्वसाधारण १जागा, अनुसूचित जमाती सर्वसाधारण १जागा, इतर मागास प्रवर्ग ३ महिला राखीव ,३ सर्वसाधारण अशा ६ जागा तर खुला गटातील एकुण १६ जागामधे ९जागा महिला राखीव तर ७ जागा सर्वसाधारण अशा २४जागाचे आरक्षण प्रभाग निहाय चिठ्ठी काढून जाहीर करण्यात आले. प्रभाग निहाय आरक्षण प्रभाग क्रं.१,–अ, ना. मा. प्र. महिला–राखीवप्रभाग क्रं –१, ब,सर्वसाधारण खुला गट प्रभाग क्रं.२–अ, महिला सर्वसाधारण राखीव प्रभाग क्रं२–ब–सर्वसाधारण खुला गट प्रभाग क्रं–३अ, ना.मा.प्र.महिला, राखीव प्रभाग क्रं ३–ब,सर्वसाधारण खुला गट प्रभाग क्रं ४–अ सर्वसाधारण महिला राखीव प्रभाग क्रं ४–ब,सर्वसाधारण खुला गटप्रभाग क्रं ५–अ सर्वसाधारण महिला राखीव प्रभाग क्रं ५–ब नामप्र सर्वसाधारण प्रभाग क्रं ६–अ सर्वसाधारण महिला राखीव प्रभाग क्रं ६–ब अनुसूचित जाती सर्वसाधारण प्रभाग क्रं ७ –अ. नामप्र महिला राखीव प्रभाग क्रं ७– ब सर्वसाधारण खुला प्रवर्ग प्रभाग क्रं ८–अ सर्वसाधारण महिला राखीव प्रभाग क्रं८ –ब नामप्रवर्ग सर्वसाधारण प्रभाग क्रं९–अ सर्वसाधारण महिला राखीव प्रभाग क्रं९–ब सर्वसाधारण खुला प्रवर्ग प्रभाग क्रं१०–अ सर्वसाधारण महिला राखीव प्रभाग क्रं१०–ब सर्वसाधारण खुला प्रवर्ग प्रभाग क्रं११– सर्वसाधारण खुला प्रवर्ग प्रभाग क्रं ११–ब, अनुसूचित जाती प्रभाग क्रं१२–अ सर्वसाधारण महिला राखीव प्रभाग क्रं१२–ब नामप्रवर्ग सर्वसाधारण.

## श्रीवर्धनमध्ये पालिका सोडतीने राजकीय तापमान वाढले

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठीची आरक्षण आणि सोडत प्रक्रिया बुधवार दि. ८ ऑक्टोबर रोजी दुपारी उत्साहात पार पडली.

या सोडतीकडे श्रीवर्धन तालुक्यातील नागरिक, इच्छुक उमेदवार आणि कार्यकर्त्यांचे लक्ष लागले होते.नगरपरिषदेच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात प्राधिकृत अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्री. महेश पाटील उपस्थित होते.

सकाळपासूनच शहरात उत्सुकतेचे वातावरण होते. सोडतीनंतर श्रीवर्धनच्या राजकारणात नव्या समीकरणांची पायाभरणी झाल्याचे स्पष्ट झाले आहे. श्रीवर्धन नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ – आरक्षणानुसार प्रभागांची माहिती– प्रभाग क्र. १ अ नागरिकांचा मागास प्रवर्ग ब सर्वसाधारण (महिला) प्रभाग क्र. २ अ जागा अनुसूचित जमाती ब जागा सर्वसाधारण (महिला) प्रभाग क्र. ३ अ नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) ब सर्वसाधारण प्रभाग क्र. ४ अ सर्वसाधारण (महिला) ब सर्वसाधारण प्रभाग क्र. ५ अ अनुसूचित जाती (महिला) प्रभाग क्र. ५ ब सर्वसाधारण प्रभाग क्र. ६ अ नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) ब सर्वसाधारण प्रभाग क्र. ७ अ नागरिकांचा मागास प्रवर्ग

(महिला) ब सर्वसाधारण प्रभाग क्र. ८ अ सर्वसाधारण (महिला) ब सर्वसाधारण प्रभाग क्र. ९ अ नागरिकांचा मागास प्रवर्ग ब सर्वसाधारण (महिला) प्रभाग क्र. १० अ अनुसूचित जमाती (महिला) ब जागा १० सर्वसाधारण सोडतीचा निकाल उपविभागीय अधिकारी महेश पाटील, श्रीवर्धन यांच्या हस्ते जाहीर करण्यात आला,


### जाहिर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे–मोर्बे, ता–पनवेल, जि–रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**– मिळकतीचे वर्णण–**

**मौजेः मोर्बे, तालुका–पनवेल, जिल्हा रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर.पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| मोर्बे | श्री धर्मा गोपाळ पाटील | ७९/२ | १.०५.६० ०.१२.३० १.१७.९० पैकी विक्री क्षेत्र ०.१९.६५ | १८.२४ |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार–मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, हर तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा–या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण: पनवेल**
**दिनांक: ०८/१०/२०२५**

**सही/–**
**अॅड. चित्तरंजन सुधाकर लाड**
**पत्ता–०३, श्री हरेकृष्णा को. ऑ. सोसायटी, प्लॉट नं. १२, सेक्टर ०५, नविन पनवेल**
**ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६**
**मो. क्र. ९६९९४९९९६३**


## रोहा– अष्टमीत इच्छुकांचा हिरमोड तर काहींना आनंद

**रोहे :** रोहा अष्टमी नगर परिषदेच्या आरक्षण सोडती मध्ये काही काही ठिकाणी आनंद तर काही ठिकाणी हिरमोड अशी परिस्थिती कार्यकर्त्यांमध्ये दिसून आली. इच्छुक असलेल्या उमेदवाराच्या ठिकाणी आरक्षण पडल्यामुळे इच्छुक मध्ये हिरमोड झाल्याचे दिसून आले. तर काही ठिकाणी आपल्याला हवे असे आरक्षण पडल्याने आनंद व्यक्त केला गेला आहे.

रोहा नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ या कालावधीत होणाऱ्या निवडणुकीसाठी नागरिकांचा मागासप्रवर्ग, नागरिकांचा मागासप्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम बुधवारी ( ८ ऑक्टोबर २०२५) रोजी सकाळी ११ वाजता रोहा नगर परिषदेच्या कै.द.ग. तटकरे सभागृहात पार पडला. आरक्षण सोडत प्राधिकृत अधिकारी रवींद्र राठोड व रोहा अष्टमी नगरपरिषदेचे मुख्य अधिकारी अजयकुमार एडके यांच्या मार्गदर्शनाखाली आरक्षण सोडत घेण्यात आली

यावेळी यशवंत शिंदे, अॅड मनोजकुमार शिंदे,माजी गटनेते महेंद्र गुजर,वंचीत बहुजन आघाडी अध्यक्ष देविदास जाधव,भाजप सरचिटणीस शैलेश रावकर, महेश कोलाटकर,समिर सकपाळ,वसंत शेलार, अप्पा देशमुख,मयुर पायगुडे,चंद्रकांत पार्टे,प्रकाश कोळी,रवी चाळके,अशोक धोत्रे,मजिद पठाण,परशुराम चव्हाण,उस्मान रोहे शकर,अॅड सार्थक जाधव,मंगेश रावकर,आदित्य कोंढाळकर आदी उपस्थित होते.

आरक्षणा मध्ये प्रभाग क्रमांक १ अ सर्वसाधारण (महीला ) १ ब सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक २ अ सर्वसाधारण (महीला ), २ ब सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ३ अ सर्वसाधारण ( महीला ) ३, ब नागरीकांचा मागास प्रवर्ग, प्रभाग क्रमांक ४ अ सर्वसाधारण (महीला ), ४ ब सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ५ अ सर्वसाधारण ( महीला ) ५ ब नागरीकांचा मागास प्रवर्ग, प्रभाग क्रमांक ६ अ सर्वसाधारण (महीला ),६ ब सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ७ अ नागरीकांचा मागास प्रवर्ग ( महीला ), ७ ब सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ८ अ सर्वसाधारण (महीला), ८ ब सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ९ अ नागरीकांचा मागास प्रवर्ग ( महीला ), ९ ब सर्वसाधारण प्रभाग क्रमांक १० अ नागरीकांचा मागास प्रवर्ग (महीला ) ब सर्वसाधारण

## मुरुड जंजिरा : २० जागांचे आरक्षण जाहीर

**मुरुड :** मुरुड नगरपरिषदेचे नगराध्यक्ष पदाचे आरक्षण ओबीसी महिला म्हणून जाहीर झाल्यानंतर आज पालिकेच्या दहा प्रभागातील २० जागांची आरक्षण सोडत पार पडली. यात काही विद्यमानांचा पत्ता कट झाला आहे. नवीन इच्छुकांना संधी मिळाली आहे तर काही विद्यमानांना अन्य प्रभागात जाऊन निवडणूक लढवावी लागणार आहे.

येथील पालिकेच्या १० प्रभागातील नगरसेवकांच्या २० जागांची आरक्षण सोडत आज प्राधिकृत अधिकारी –श्रीकांत गायकवाड व मुख्याधिकारी –सचिन बच्छाव यांच्या अध्यक्षतेखाली आरक्षण सोडत दुपारी ३ वाजता नगरपरिषदेतील कार्यालयातील सभागृहात घेण्यात आली.यावेळी शहरातील राजकीय पक्षांचे नेते हसमुख जैन, अविनाश दांडेकर,संजय गुंजाळ, प्रकाश सरपाटील,रहिम कबले, पांडुरंग आरेकर,किर्ती शहा ,आदेश दांडेकर,उपस्थित होते

प्रभाग क्र.१ सर्वसाधारण (महिला) सर्वसाधारण (खुला) ,प्रभाग क्रमांक २ ना.मा.प्र. (खुला) सर्वसाधारण (महिला) ,प्रभाग क्रमांक ३ ना.मा.प्र. (महिला) सर्वसाधारण (खुला), प्रभाग क्रमांक ४ ना.मा.प्र. (खुला) सर्वसाधारण (महिला) ,प्रभाग क्रमांक ५ ना.मा.प्र. (महिला) सर्वसाधारण (खुला),प्रभाग क्रमांक ६ सर्वसाधारण (महिला) सर्वसाधारण (खुला) ,प्रभाग क्रमांक ७ ना.मा.प्र. (महिला) सर्वसाधारण (खुला) ,प्रभाग क्रमांक ८ अनुसूचित जमाती (महिला) सर्वसाधारण (खुला) ,प्रभाग क्रमांक ९ अनुसूचित जमाती (खुला) सर्वसाधारण (महिला) ,प्रभाग क्रमांक १० अनुसूचित जमाती (महिला) सर्वसाधारण (खुला).


### पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

**तात्पुरत्या स्वरुपात फटाके विक्री स्टॉल उभारणेकामी जाहिर सूचना**

पनवेल महानगरपालिकेमार्फत सन २०२५ दिवाळी सणानिमित्त तात्पुरते फटाके विक्रीसाठी खाली नमूद केलेल्या ठिकाणी स्टॉल उभारणेसाठी जागा उपलब्ध करुन देणेत येणार आहेत. सदर जागा मर्यादित ठेवणेत आलेल्या आहेत. इच्छुक फटाके विक्री धारकांनी आपल्या लायसन्सची प्रत अर्जासोबत जोडावयाची आहे. प्रत्येक स्टॉल हा १० X १० आकाराचा राहील. तसेच प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

| अ. क्र. | नोड | आरक्षण | सेक्टर | भुखंड क्र. | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १) | पनवेल (पू.) | प्ले ग्राऊंड | २E | ३६ | ८७६४.५४ |
| २) | कळंबोली | प्ले ग्राऊंड | १ | २८ | ३३३९२.११ |
| ३) | खारघर | प्ले ग्राऊंड | १२ | १२ ए | १४९१.०४ |
| ४) | कामोठे | प्ले ग्राऊंड | ८ | २५ | ४९७६.८६ |
| ५) | तळोजा | प्ले ग्राऊंड | १० | ११३+११४ | ६६७१.५९ |

सबब, तात्पुरत्या फटाके विक्रीसाठी महानगरपालिकेकडे जागा मिळणेकामी संबंधित इच्छुकांनी फटाके विक्री धारकांनी दिनांक १५ /१०/२०२५ रोजी सायं. ४:०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिका मुख्यालयात अर्ज जमा करावेत. सदर मुदतीत प्राप्त न होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**जा.क्र :–पमपा/जनसंपर्क./३१२५/**
**प्र.क्र. ५०९/५२३/२०२५**
**दिनांक :– ०८/१०/२०२५**

**सही/–**
**उपायुक्त ( मालमत्ता)**
**पनवेल महानगरपालिका**



### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ४४/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती... रोहा येथील सांडपाणी उदंचन गृहाची एक वर्षाच्या कालावधीकरीता परिचालन व देखभाल सेवा पुरविणे. | ₹ २९,८९,१७६.०० |
| २ | पेण अलिबाग प्रदेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... अलिबाग येथील महामंडळाच्या कार्यालयात मेकॅनिकल मोबाईल कॉम्पॅक्टर स्टोरेज सिस्टमचा पुरवठा करून बसविणे. | ₹ ३७,८२,०४१.०० |
| ३ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांची देखभाल व दुरूस्ती... पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांची वार्षिक तत्वावर सर्वसमावेशक देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ३३,०५,४००.०० |
| ४ | पाताळगंगा येथील जुन्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती........... पाताळगंगा येथील जुन्या पाणीपुरवठा योजनेच्या अशुद्ध व शुद्ध जलउदंचन केंद्रातील २५० अश्वशक्ती क्षमतेच्या पंपांची दुरुस्ती करणे. | ₹ ३३,७८,८००.०० |
| ५ | पेण अलिबाग प्रदेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... पोयनाड येथील शुद्ध जलउदंचन केंद्राचे परिचालन करणे. | ₹ २४,९६,९६५.०० |
| ६ | पेण अलिबाग प्रदेशिक व नागोठणे औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... नागोठणे येथील कर्मचारी वसाहत परिसर, जलशुद्धीकरण केंद्र, पोयनाड येथील जॅकवेल व वेलशेत - एचएसआर परिसराची एक वर्षाच्या कालावधीसाठी साफसफाई व देखभाल करणे. | ₹ २८,५२,७६०.०० |
| ७ | पाताळगंगा येथील नवीन व जुनी पाणीपुरवठा योजना व सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती.... पाताळगंगा येथील अशुद्ध, शुद्ध जलउदंचन केंद्र, सांडपाणी उदंचन गृह येथील एलटी पॅनेल व स्टार्टर्सची देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ४०,१४,४४०.०० |
| ८ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांची देखभाल व दुरूस्ती... रोहा औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांची दोन वर्षांच्या कालावधीसाठी वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ २६,७०,७४४.०० |
| ९ | पेण अलिबाग प्रदेशिक व नागोठणे औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... पोयनाड व नागोठणे येथील जलशुद्धीकरण केंद्रातील स्केल व अल्गासाइड ट्रीटमेंट वापरून वाळू फिल्टरची फिल्टरेबिलिटी सुधारणे. | ₹ २९,४०,०००.०० |
| १० | अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... आंबेपूर टँक परिसरात कोसळलेल्या कंपाऊंड भिंतीची पुनर्बांधणी करणे. **(दुसरी मागणी)** | ₹ ३६,१६,२१४.०० |

उपरोक्त अ.क्र. १ ते ९ वरील कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक १०/१०/२०२५ ते दिनांक २४/१०/२०२५ पर्यंत व अ.क्र. १० वरील कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक १०/१०/२०२५ ते दिनांक २०/१०/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी अ.क्र. १ ते ९ वरील कामांबाबत दिनांक १४/१०/२०२५ पूर्वी व अ.क्र. १० वरील कामाबाबत दिनांक १३/१०/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा अ.क्र. १ ते ९ वरील कामांबाबत दिनांक १६/१०/२०२५ पासून व अ.क्र. १० वरील कामाबाबत दिनांक १४/१०/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# उरण तालुक्यातील शेतजमिनीला सोन्याचा भाव

## जमिनीची विक्री करण्याऐवजी भाड्याने देण्याचा ट्रेण्ड | शेतकऱ्यांच्या जनजागृतीला यश

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यात येऊ घातलेल्या विविध प्रस्तावित प्रकल्पांसाठी परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी व संपादन करण्यासाठी सरकार व त्यांच्या हस्तकांकडून प्रयत्न सुरू आहेत, मात्र काही सामाजिक संस्था व स्थानिक पुढाऱ्यांच्या जनजागृतीमुळे येथील शेतकऱ्यांनी जमिनी विक्री करण्याऐवजी भुई भाड्याने देण्याचा नवा ट्रेण्ड उदयास येऊ लागला आहे.

शेतकऱ्यांच्या जमिनींचे मालकी हक्क अबाधित राखण्यासाठी सुरू झालेला ट्रेण्डचे सर्वच स्तरावर स्वागत केले जात आहे. उरण परिसरात मागील वीस वर्षांत महामुंबई सेझ, नवी मुंबई सेझ, विरार–अलिबाग कॉरिडॉर, खोपटा नवनगर, अटल सेतू, नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, तिसरी मुंबई (केएससी), नैना आदी विविध खासगी, शासकीय प्रकल्प प्रस्तावित आहेत.

येऊ घातलेल्या विविध प्रस्तावित प्रकल्पांसाठी शेतकऱ्यां च्या जमिनी संपादन, खरेदीचे व्यवहारात वीस वर्षांत चांगलीच तेजी आली होती. शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी करण्यासाठी दलालांचा सुळसुळाट झाला आहे. या दलालांच्या भुलथापांना व आमिषाला बळी पडून आपल्या पिकत्या जमिनी शेतकऱ्यांनीही मागचा पुढचा अथवा भावी पिढीच्या भविष्याचा कोणताही विचार न करताच जमीनी कवडीमोल भावाने बड्या भांडवलदारांना विक्री केल्या आहेत. त्यामुळे उरण परिसरातील हजारो हेक्टर जमीनीचे मालक आता स्थानिक शेतकऱ्यांच्या ऐवजी परप्रांतीय भांडवलदार बनले आहेत. हे सिडकोने नुकतेच भूखंड वाटप आणि भाडेपट्टा करारनामा निष्कासित करणेबाबत जाहीर सूचनेच्या शुद्धीपत्रकानंतर उघडकीस आले आहे.



या शुध्दी पत्रातील परप्नांतीय भांडवलदारांच्या नावांची यादी सर्वानाच विचार करायला लागणारी आहे, मात्र ज्या शेतकऱ्यांनी थोड्या पैशासाठी जमिनी विकल्या. त्यांचे पैसेही मौजमजा करुन, गाड्या घेऊन, बंगले बांधून संपून गेले आहेत, मात्र ते आपल्या वडिलोपार्जीत जमिनी कायमच्या गमावून बसले आहेत. या जमिनीचे मालकच उपरे परप्रांतीय बनल्याने आता सिडकोकडून मिळणारे कोट्यवधी किमतीचे भूखंड आणि इतर लाभही मुळ शेतकऱ्यांच्या ऐवजी परप्रांतीय भांडवलदारांनाच मिळणार आहेत. यामुळे विविध सामाजिक संस्था, निस्वार्थी नेते, पुढाऱ्यांनी केलेल्या आवाहन आणि जनजागृतीमुळे उरण परिसरातील ५० टक्क्यांहून अधिक जमिनी शेतकऱ्यांच्या मालकीच्या उरलेल्या आहेत. जमिनी भाड्याने देऊन त्यातून चांगले आर्थिक उत्पन्न मिळू शकते याची जाणीव एव्हाना शेतकऱ्यांना झाली आहे.

अशा शेकडो शेतकऱ्यांनी जमिनी विक्री करण्याऐवजी भांडवलदार, व्यावसायिकांना भुई भाड्याने देण्याचे धोरण अवलंबिले आहे. आजच्या घडीला सोन्यापेक्षा ज्यादा भाव जमिनीला मिळत आहे., अशी माहिती एमएमआरडी केआरसी (कर्नाळा,साई, चिरनेर) नवनगर विरोधी समितीचे सरचिटणीस रुपेश पाटील यांनी यांनी दिली आहे. तर उरण परिसरातील शेतकरी शेतजमीन विक्री करण्याऐवजी भांडवलदार, व्यावसायिकांना भुई भाड्याने देण्यासाठी आग्रही भूमिका घेत आहेत. कंटेनर यार्ड, कंपन्यांना प्रती स्क्वेअर फूट चार रुपये तर एकरी एक लाख ६० हजार रुपये प्रति महिना भाडे दराने जमीनीचे भाडे मिळत असल्याने शेतकरीही भाड्याने देण्यालाच अधिक प्राधान्य देत असल्याची माहिती शेतकरी व व्यावसायिक जे.डी.जोशी यांनी दिली आहे.

मागील वीस वर्षांपासूनच वारंवार केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत अनेक शेतकऱ्यांनी जमीनीची विक्री न करता भुई भाड्याने देण्यालाच अधिक प्राधान्य दिले आहे. यामुळे जमिनींची मालकीही कायम राहात असुन महिन्यांकाठी लाखो रुपयांचे भाडेही मिळत असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी मदत होऊ लागली असल्याची प्रतिक्रिया उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील यांनी व्यक्त केली आहे.

# नवी मुंबई विमानतळ पोलीस ठाण्यास मान्यता

**नवी मुंबई, पनवेल : वार्ताहर**

आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सुरक्षेसाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. गृह विभागाने नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात नवीन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ पोलीस ठाणे स्थापन करण्यास औपचारिक मान्यता दिली आहे. राज्य शासनाने सोमवारी (दि. ६) जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार, विद्यमान पनवेल शहर आणि उलवा पोलीस ठाण्यांचे कार्यक्षेत्र विभाजित करून हे स्वतंत्र ठाणे उभारले जाणार आहे.

उलवा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वाढते शहरीकरण ध्यानात घेऊन आणि भविष्यातील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रवासी संख्या लक्षात घेऊन नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी स्वतंत्र विमानतळ पोलीस ठाणे निर्माणाचा प्रस्ताव पाठवला होता. या ठाण्यात दोन पोलीस निरीक्षक, तीन सहाय्यक पोलीस निरीक्षक, सहा उपनिरीक्षक, सहा सहाय्यक उपनिरीक्षक, २७ हवालदार, ४२ पोलीस शिपाई, १९ महिला शिपाई आणि तीन चालक पोलीस शिपाई अशी मनुष्यबळाची रचना करण्यात आली आहे.



हा प्रस्ताव विमानतळ सुरू होण्यापूर्वी पोलीस ठाण्यातील कर्मचारी व अधिकाऱ्यांची शासन दरबारी पदनिर्मिती, पोलीस ठाणे इमारत बांधणीचे काम होणे आवश्यक असल्याने सिडको मंडळ आणि शासनाकडे वारंवार पोलीस विभागाचा पाठपुरावा सुरू होता. नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या या प्रयत्नांना यश आले असून या नव्या पोलीस ठाण्यासाठी १०८ नियमित पदे निर्माण करण्यात आली आहेत.

या पदांवरील आस्थापना खर्चासाठी शासनाने तीन कोटी ३८ लाख रुपये आणि इमारतीमधील वाहन व इतर साहीत्यासाठी एक कोटी ७६ लाखांच्या खर्चाची तरतूदीला शासनाने मंजूरी दिल्याचे सोमवारी घेतलेल्या निर्णयात म्हटले आहे.

# वाहतूक नियमनाबाबत विद्यार्थ्यांचे प्रबोधन

**पनवेल : वार्ताहर**

सेंट झेवियर स्कूल, कोनगाव या शाळेतील आठवी, नववी, दहावी वर्गातील जवळपास ३०० ते ३५० विद्यार्थी–विद्यार्थिनींचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ यांच्याकडून प्रबोधन करण्यात आले.

विद्यार्थ्यांना वाहतूक नियमन आणि रस्ते सुरक्षा विषयक माहिती देण्यात आली. सायबर गुन्ह्यांबाबत आणि सायबर हेल्पलाईन १९३० बाबत माहिती दिली. सोशल मीडियाचे फायदे–तोटे, इंटरनेटचा वापर करताना घ्यावयाची काळजी, ऑनलाईन गेम खेळताना घ्यावयाची काळजी महिला सुरक्षा आणि निर्भया पथक तसेच पोलीस हेल्पलाईन ११२ बाबत माहिती दिली.



# जय माताजी महिला भजन मंडळातर्फे भजन सेवा

**पनवेल : वार्ताहर**

नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने पनवेल शहरातील हिंदू सार्वजनिक महोत्सव मंडळ येथे जय माताजी महिला भजन मंडळातर्फे भावपूर्ण भजन गायन सादर करण्यात आले तसेच संगीताच्या तालावर महिला भगिनींनी गरबा नृत्य करून देवीला साद घातली.

भक्तिभावाने वातावरण भारले गेले आणि उपस्थित भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जय माताजी महिला भजन मंडळ गेली दहा वर्षांपासून सातत्याने भजन सेवा देत असून, भजनाच्या माध्यमातून सामाजिक कार्यातही मोलाचे योगदान देत आहे. या मंडळाने सार्वजनिक गोशाळांमध्ये गायींसाठी चारा व पाण्याची व्यवस्था करण्यासाठी देणगीच्या माध्यमातून मोठे योगदान दिले आहे, तसेच इतर सामाजिक उपक्रमांमध्येही सहभाग घेतला आहे.

या मंडळात मंजू कालोर, मधु परमार, जसोदा कुमावत, निमा वैष्णव, नीलम वैष्णव आणि इतर अनेक भगिनी सक्रियपणे कार्यरत आहेत. त्यांच्या कार्यामुळे समाजात आध्यात्मिकतेसोबतच सेवा भावनाही दृढ होत आहे.

# विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा परिसरातील सामाजिक कार्यकर्ते अतुल दत्तात्रेय मालकर यांच्या विशेष प्रयत्नातून लायन्स क्लब ऑफ यांच्यामार्फत राजिप शाळा तळवली व राजिप शाळा वडगाव डोंगरवाडी येथे शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

या वेळी विद्यार्थ्यांना टिफीन बॉक्स, कंपास पाउच, पेन, पट्टी व खोडरबर व इतर साहित्य वाटप करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे वातावरण दिसून आले.

या वेळी रा.जि.प शाळा तळवली येथील मुख्याध्यापक बोरगे सर उपशिक्षक मांडे सर तसेच लायन्स क्लब ऑफ पनवेल सर्गमचे अध्यक्ष प्रेमेंद्र बहिरा, सदस्य गोडसे सर व गोडसे मॅडम, गावातील



सामाजिक कार्यकर्ते मधुकर मालकर, अतुल मालकर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनिल वाघे शालेय व्यवस्थापन समितीचे माझी अध्यक्ष प्रभाकर वाघे व समिती सदस्य उपस्थित होते. तसेच वडगाव डोंगरवाडी येथील मुख्याध्यापिका पाटील मॅडम उपशिक्षिका मुंढे मॅडम, ग्रामस्थ उपस्थित होते.

लायन्स क्लब ऑफ पनवेल सर्गम व सामाजिक कार्यकर्ते अतुल मालकर यांच्यामार्फत डोंगरवाडी ला एक उत्तम शाळा तयार व्हावी, यासाठी योग्य ते प्रयत्न केले जातील असे सांगण्यात आले. दोन्ही ठिकाणी कार्यक्रम खेळीमेळीच्या वातावरणात कार्यक्रम झाले.

# ठाणे विभागीय सहसंचालकांकडून चिरनेर परिसरातील शेतीची पाहणी

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यात ठाणे विभागीय सहसंचालक शिवाजी आमले यांनी तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर, कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील, कृषी पर्यवेक्षक शुभम गटकळ, मंडळ अधिकारी शिवाजी लोहकरे, कृषी सहाय्यक सुषमा गायकवाड, कृषी सहाय्यक सुरज घरत या सर्वांच्या उपस्थितीत उरण तालुक्यातील गावांना नुकतीच भेट देऊन, शेतकऱ्यांच्या प्रात्यक्षिकांची पाहणी करून घेतली.



राष्ट्रीय अन्नसुरक्षा व पोषण तृणधान्य अभियानांतर्गत चारसुत्री पद्धतीने घेतलेल्या रत्नागिरी आठ या भात लागवड प्रात्यक्षिकाची पाहणी केली. दरम्यान, चिरनेर येथे पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत स्थापन झालेल्या श्री महागणपती सेंद्रिय शेतकरी उत्पादक गटातील शेतकऱ्यांची भेट घेऊन त्यांना मार्गदर्शन केले. सामूहिक विकास याविषयीदेखील त्यांनी मार्गदर्शन केले. पिकांची फेरपालट व हिरवळीच्या खतांचा वापर यातून मातीचे आरोग्य निरोगी ठेवावे, असे आवाहन त्यांनी या वेळी केले.

# डी.डी. विसपुते महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अभिजात मराठी भाषा दिवस व अभिजात मराठी भाषा सप्ताह राज्यात ३ ते ९ ऑक्टोबर या दरम्यान साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेच्या वतीने नुकताच डी.डी विसपुते महाविद्यालयामध्ये व्याख्यान व प्रश्नमंजूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. या वेळी श्री धनराज विसपुते आदर्श शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष व प्राध्यापक डॉ. सीमा कांबळे आणि शिक्षक वृंद यांचे सहकार्य लाभले.



मराठी भाषेची गौरवशाली परपंरा विविध समाजघटकांसमोर येण्यासाठी मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, भाषेचे संवर्धन होण्यासाठी, जनमानसामध्ये मराठी भाषेच्या अभिजाततेची ओळख व्हावी, अभिजात मराठी भाषेसंदर्भातील संशोधन, जनजागृती जास्तीत जास्त व्हावी याकरिता प्रतिवर्षी ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा दिवस म्हणून साजरा करण्यात येणार आहे. तसेच अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या अनुषंगाने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली अभिजात मराठी भाषा संवर्धन सप्ताहाचे अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन महापालिका क्षेत्रात करण्यात आले आहे.

### अभिजात मराठी भाषा निबंध स्पर्धा आणि व्याख्यान

त्यानूसार अभिजात मराठी भाषा सप्ताह अंतर्गत महापालिका मनपा हद्दीतील सर्व नागरिकांसाठी 'अभिजात मराठी भाषा' या विषयाची निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. याच बरोबर 'मराठी भाषाचे सौंदर्य आणि नवी दिशा' या विषयावरती प्रा. डॉ. वि.ल.धारूरकर, छत्रपती संभाजीनगर यांच्या व्याख्यानाचे दिनांक ९ ऑक्टोबर रोजी आयोजन करण्यात आले आहे. तसेच विविध शाळांमध्ये प्रश्नमंजूषा, व्याख्यान, प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान, मराठी भाषेबाबत अनेक उपक्रम राबविण्यात येत आहे.

# दिव्यांग विद्यार्थ्यांना घडवली पनवेल ते गोवा हवाई सहल

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरणचे कार्यसम्राट आमदार महेश बालदी, मित्र मंडळ व भाजप व्यापारी सेल असोसिएशन उरण यांच्या विद्यमाने भारताचे कर्तबगार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५व्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेल तालुक्यातील चिपळे येथील आदिवासी, कर्णबधीर, गतिमंद निवासी विद्यालयातील २९ दिव्यांग मुलांना सहशिक्षकांसह पनवेल ते गोवा असा विमान प्रवास घडविला.



यासाठी हितेश शहा, हस्तीमल मेहता, अजित भिंडे, भावेश शहा, हरेश भिंडे, आनंद ठक्कर, चेतन ठक्कर, दीपक दळी, अभिषेक जैन हे या सहलीचे आयोजक होते. त्यांच्या समवेत शाळेचे शिक्षक मनोज कुरुलकर हेमंत, साधना शेट्ये, अनुष्का पावसे इत्यादी नी या सहलीचा आनंद लुटला.

दिव्यांगांना विमान प्रवास करण्याचा सुखद आनंद मिळाल्याने दिव्यांगांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसून आल्याने त्यांनी आपल्या भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आपल्या संदेशातून शुभेच्छा दिल्या आणि आयोजक यांनी हवाई सहल घडविल्या बद्दल आयोजकांचे आभार मानले.

# बँक ऑफ इंडियातर्फे नवी मुंबईत हिंदी महिना साजरा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

बँक ऑफ इंडिया, अकादेमी फॉर प्रोफेशनल एक्सलेन्स, नवी मुंबई येथे १ ते २९ सप्टेंबर २५ हिंदी महिना साजरा करण्यात आला. या दरम्यान कार्यालयात स्टाफ सदस्यांनी दैनिक कामकाजामध्ये हिंदी भाषेचा वापर केला. १४ सप्टेंबर २५ रोजी हिन्दी दिवस साजरा करण्यात आला.

हिंदी माहचे समापन संस्थानाचे प्राचार्य मनीष कर राय व समस्त कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत गृहमंत्री अमित शाह तथा बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापकीय आणि मुख्य कार्यकारी अधिकारी रजनीश कर्नाटक अणि वित्तीय सेवाएं विभाग, सचिव एम नागराजू यांच्या संदेशांचे वाचन करण्यात आले. या वेळी कार्यालयीन



कामकाजात जास्तीत जास्त हिंदी भाषेचा वापर करण्याची प्रतिज्ञा प्राचार्य मनीष कर राय व सर्व कर्मचाऱ्यांनी घेतली.

प्राचार्य एवं उप महाप्रबंधक मनीष कर राय यांनी भाषणामध्ये आवाहन केले की, आपल्या कार्यालयात जास्तीय जास्त काम हिंदीत केले जावो. सतत हिंदी भाषेचया वापर करण्यात यावा आणि हिंदी भाषेचे वैशिष्टय हे संपूर्ण भारताला जोडण्याची भाषा आहे. हिंदी भाषेचा वापर करून सर्वांनी राष्ट्र निर्मार्णमध्ये सहभागी व्हावे. त्यांनी हिंदी स्पर्धेचे सर्व विजेत्यांना शुभेच्छा दिल्या.

हिंदी महिन्यामध्ये हिंदी वर्ग पहेली, हिंदी मुहावरे तथा लोकोक्तियां, अंताक्षरी स्पर्धा घेण्यात आल्या. मनीष कर राय आणि उप प्राचार्य सत्यप्रकाश यानी हिंदी स्पर्धेच्या विजेत्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार रमेश साखरे गच्छी, मुख्य प्रबंधक (राजभाषा) यांनी केले त्यानंतर हिंदी महिन्याची सांगता करण्यात आली.



# शिरवणे जुईनगर येथे वसुंधरा पायी दिंडीचे स्वागत

**नवी मुंबई : बातमीदार**

रामानंदाचार्य दक्षिणपीठ नाणीजधाम यांच्या विद्यमाने जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या प्रेरणेने उपपीठ मुंबई ते श्रीक्षेत्र नाणीजधाम, रत्नागिरीपर्यंत वसुंधरा पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे.

वसुंधरा पायी दिंडीच्या माध्यमातून पर्यावरणाची करू रक्षा, मग पृथ्वीची होईल सुरक्षा असा संदेश देत नरेंद्राचार्यजींच्या सिद्धपादुका घेऊन गजर करत वसुंधरा पायी दिंडी मार्गस्थ होत आहे. नवी मुंबईतील सायन पनवेल महामार्गावरील शिरवणे जुईनगर येथे वसुंधरा पायी दिंडीचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. या वेळी रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजींच्या सिद्धपादुकांचे दर्शन घेऊन वसुंधरा पायी दिंडीतील हजारो भक्तगणांना माजी नगरसेविका माधुरी सुतार यांनी शुभेच्छा दिल्या. एक पेड माँ के नाम या उपक्रमा अंतर्गत माजी नगरसेविका माधुरी सुतार यांच्या हस्ते या रोपाचे विधीवत पुजन करून वृक्षारोपणदेखील करण्यात आले.

## निवडक

### दुचाकी अपघातात एक जण जखमी

**पेण :** तालुक्यातील तरणखोप येथे दोन दुचाकींच्या अपघातात एकजण जखमी झाला आहे. पेण पोलीस ठाणे हद्दीत गिरोबा हॉटेल बाजुस तरणखोप पेण सर्विस रोडवर येथे ही घटना घडली आहे. फिर्यादी रा. रामवाडी हे त्यांच्या ताब्यातील मोटरसायकल ही स्वतः तरणखोप ते पेण असे सर्व्हिस रोडने चालवीत घेवुन येत असताना त्यांच्या मागुन येणारे एक अनोळखी मोटरसायकल वरील अज्ञात चालक याने त्याच्या ताब्यातील मोटारसायकलने खबर देणार यांचे मोटरसायकल हिस पाठीमागुन ठोकर मारुन अपघात केला. यात फिर्यादी यांच्या पायास व हातास गंभीर दुखापती झाल्या. याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह संदीप शिरगावकर हे करीत आहेत.

### शिक्षक सुधाकर थळेंना पदवी



**चौक :** आपल्या शिक्षकी पेशाला शोभणारे वर्तन असणारे आणि सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेले खालापूर तालुक्यातील वडवळ शाळेचे शिक्षक सुधाकर रामकृष्ण थळे हे एम.एड. ही शिक्षकी पेशातील पदवी पास झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सुधाकर थळे हे सन १९८७ साली डी.एड. उत्तीर्ण होऊन १७ मार्च १९८८ रोजी शिक्षक म्हणून शाळेत हजर झाले. आज सेवा ३८ वर्षे पूर्ण होत असून येत्या काही महिन्यात ते सेवा निवृत्त होत आहेत. असे असताना त्यांनी एम.एड.ही पदवी प्राप्त करण्याचा ध्यास घेतला आणि यावर्षी ते प्रथम श्रेणीत एम. एड. ही पदवी संपादन केली. ७२% गुण प्राप्त करून उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

# ताम्हिणी घाटात संरक्षक कठड्यांचा अभाव

## ◆ धोकादायक वळणे अपघातांना निमंत्रण

### माणगाव-विळे परिसरात रुंदीकरण करण्याची मागणी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील निसर्गाच्या सान्निध्यात वसलेल्या आणि पर्यटकांना भुरळ घालणाऱ्या ताम्हिणी घाटात तीव्र उतार आणि चढाईचा अवघड वळणांचा मोठा घाटरस्ता आहे. या घाटात पुरेसे संरक्षण कठडे आणि संरक्षक भिंतींचे कवच नसल्याने धोकादायक वळणांवर वारंवार अनेक वेळा जीवघेणे अपघात होत आहेत.

माणगाव ते विळे औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक कारखान्यांच्या २० कि. मी. परीसरापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण न झाल्याने अपघातांत दुपटीने वाढ झालेली आहे. येथील औद्योगिक प्रकल्पांमधून मोठमोठी अवजड वाहनांची वर्दळ वाढली आहे. त्यामुळे पर्यटकांना आणि प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. याबाबत रस्ते विकास महामंडळ अनभिज्ञ असून काहीच कारवाई करताना दिसत नाही.

माणगाव ते विळे आणि विळे ते पूणे या महामार्गावर दिवसेंदिवस रहदारी वाढत आहे. त्यामुळे दररोज अपघात होऊन अनेक नाहक बळी जात आहेत. दिघी बंदर ते पूणे या महामार्गावरील दिघी ते माणगाव आणि विळे ते पूणे हा महामार्ग पूर्ण झाला आहे, मात्र माणगाव ते विळे हा महामार्ग रुंदीकरण न झाल्याने त्यांचे दुपदरीकरण अद्याप झालेले नाही. हा भाग दुर्गम आणि डोंगराळ आहे. या महामार्गावर देखील अवघड वळणे आहेत. तसेच हा महामार्गाचे रुंदीकरण न झाल्याने नेहमीच वाहतूक कोंडी होत असते. गेल्या पाच वर्षांत पाच पट अधिक रहदारी आणि पर्यटकांची संख्या वर्दळ वाढली आहे. याचा मोठा फटका प्रवाशांना निजामपूर आणि माणगाव शहरातील वाहतूक कोंडीला बसतो. येथील औद्योगिक प्रकल्पांमधून



मोठमोठी कंटेनर व अवजड वाहने सातत्याने दिघी बंदरात येजा करीत असतात. त्यामुळे येथील धोकादायक वळणांवर अपघात होत असतात.

निसर्ग रम्य ताम्हिणी घाटात विविध जैवविविधता आणि निसर्ग सौंदर्य असल्याने भारतीय पर्यटक मोठ्या प्रमाणावर येत असतात, मात्र जीवघेणी अवघड वळणे, धोकादायक तीव्र उतार, एका बाजूला असणाऱ्या खोलच खोल दरी, आकाशाला भिडणारे कडे कपारी, उंचच उंच डोंगरावरुन पडणारे धबधबे, घनदाट जंगलातील अवाढव्य वृक्षवल्ली या सर्व भितीदायक भागातील महामार्गामुळे जीव मुठीत धरूनच प्रवास करावा लागतो, मात्र प्रवाशी आणि पर्यटक यांच्या सुरेक्षेच्या दृष्टीने कोणत्याही ठोस उपाययोजना केल्या गेल्या नाहीत. संरक्षक भिंतीची दुरवस्था झाली आहे. संरक्षक कठडे तुटलेल्या अवस्थेत आहेत.

काही ठिकाणी रस्ता खचलेला आहे. रस्ता समपातळीत नसल्याने वाहन चालवताना चालकांना तारेवरची कसरत करावी लागते. यामुळे अपघातांचे प्रमाण जास्त वाढले आहे. येथील निसर्ग सौंदर्या बरोबरच फेसाळते उंचीवरुन खाली कोसळणारे धबधबे पर्यटकांचे मुख्य आकर्षण आहे. या घाटात सुट्टीच्या दिवशी तरुणाई पूणे आणि मुंबई या शहरातून अवतरलेली असते. त्यांचा रस्त्यावरच राजरोसपणे धांगडधिंगा सुरू असतो. त्यातील बहुतांश मद्यधुंद अवस्थेत असतात. या बेधुंदपणे नाचणाऱ्या तरुणांना आवरण्यासाठी पुरेसे पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात येत नसल्याने नेहमीच हाणामारी होत असतात. त्यामुळे काही वेळा घाटात वाहतूक कोंडी होत असते.

### ...तर पर्यटनही वाढेल

***या घाटातील शासकीय विश्रामगृहाची दुरवस्था होऊन जमिनदोस्त झाले आहे. याबाबत खासदार सुनील तटकरे, मंत्री भरत गोगावले आणि मंत्री आदिती तटकरे यांनी तातडीने कारवाई केल्यास येथील पर्यटन अधिक वाढेल. त्यामुळे या ताम्हिणी घाटातील स्थानिकांना रोजगाराच्या संधी अधिक निर्माण होतील. त्याचबरोबरीने दक्षिण रायगड जिल्ह्यातील पर्यटन आणि रोजगार सक्षम होण्यासाठी मदत होईल. विशेष म्हणजे माणगाव आणि निजामपूर शहरातील वाहतूक कोंडीला मोठ्या प्रमाणात प्रतिबंध बसेल.***

## दुष्मी रोडवर महिलेचा विनयभंग; गुन्हा दाखल

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील दुष्मी खारपाडा रोडवर महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत माहिती अशी कि, महिला फिर्यादी (रा.वड्माळवाडी, ता.पेण) या सोमवार, ६ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.३० च्या सुमारास वडमाळ वाडी येथील त्यांच्या घरुन भाजी विक्री करण्याकरिता खारपाडा नाक्याकडे जात असताना दुष्मी रोडवरील आमरीस पुरी यांच्या फार्म हाउससमोर फार्म हाउसवर पार्टीसाठी आलेल्या आरोपी (रा.वहाळ ता.पनवेल) यांने महिला फिर्यादी या एकटयाच फार्म हाउस जवळुन रस्त्याने जात असल्याचा फायदा घेवुन फिर्यादी यांची इच्छा नसताना त्याचा उजवा हात पकडून विनयभंग केला.

याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं.१९८/२०२५ भादंवि कलम ७९,७४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास महिला पोलीस नाईक गुरव हे करीत आहेत.

## खारपाले ब्रिजवर दुचाकी अपघातात पत्नीचा मृत्यू

**पेण : प्रतिनिधी**

वडखळ परिसरातील खारपाले ब्रिजवर सोमवार, ६ ऑक्टोबर रोजी दुपारी सुमारे १.२० वाजण्याच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला असून तिचा पती गंभीर जखमी झाला आहे. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

पेण तालुक्यातील खारकलाई, पो. आमटेम येथील गंगाराम परशुराम नाईक (वय ५२) व त्यांची पत्नी संगिता गंगाराम नाईक (वय ४९) हे दोघे आपल्या ॲक्टिव्हा दुचाकी (एमएच ०६बी.टी.२६३१) वरून मुंबई-गोवा महामार्गाने वडखळ बाजूने दुपारी १:३० च्या सुमारास आमटेम येथे परत येत असताना, मागून येणाऱ्या टँकर (एमएच ४६ बीयु ७०३९)ने जोरदार धडक दिली. या अपघातात संगिता नाईक यांचा जागीच मृत्यू झाला तर गंगाराम नाईक गंभीर जखमी झाले आहेत.

या घटनेप्रकरणी वडखळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी चालक मोहम्मद सलमान इसराक अहमद (वय २५, रा. भैरवा, चंदनपुर, महाराजगंज, उत्तरप्रदेश याला अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस निरीक्षक संतोष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार महेश मधुकर ठाकूर करीत आहेत.

## माणगाव येथील मोफत शिबिरात १३१ रुग्णांची तपासणी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व प्रसिद्ध उद्योजक विजय मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी (दि.८) मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन महेंद्र पितांबर मेथा यांच्या प्रशस्त जागेत हॉलमध्ये जुने एसटी स्टॅन्ड जवळ माणगाव याठिकाणी करण्यात आले होते.

या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ.प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन १३१ रुग्णांची तपासणी



करून ४९ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. सदरचे शिबीर हे दर महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या बुधवारी आयोजित केले जाते.

शिबीर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी विजयशेठ मेथा, सुप्रिया शिंदे, तनुजा मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलचे टीम व्यवस्थापक डॉ.प्रकाश पाटील, डॉ.रेणुका, सोनाली पाटील, अवंतिका रिकामे, साक्षी चिणके, रामदास पवार यांनी सहकार्य करीत विशेष परिश्रम घेतले.

## मजगाव नांदगाव पंचक्रोशीतर्फे किल्ले बांधणी स्पर्धा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील श्रीशिवप्रेमी शिवभक्त मित्र मंडळ मजगाव नांदगाव तर्फे दिपावलीच्या सुट्टीमध्ये तालुकास्तरीय किल्ले बांधणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा सर्व विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली असून स्पर्धकांनी किल्ले आपल्या स्वतःच्या मालकीच्या जागेत उभारणे आवश्यक आहे. इच्छुक स्पर्धकांनी १६ ऑक्टोबर २०२५ पर्यत आपली नावे मंडळाकडे द्यावीत. किल्ले १८ ऑक्टोबर २०२५ पर्यंत उभारुन पूर्ण करावेत. शिवदुर्ग विज्ञान व गडकिल्ल्यांची नाविन्यपूर्ण कल्पनेनुसार त्यांची उभारणी, देखावा, मातीकाम व इतर सजावटींना विशेष प्राधान्य देण्यात येईल. किल्ले हे स्वहस्ते व नैसर्गिक साधनांचा वापर करुन उभारावेत त्यात प्लॅस्टिकचा वापर करू नये. उभारलेल्या किल्ल्याची ऐतिहासिक माहिती देणे बंधनकारक आहे. किल्ल्यांचे १९ ते २३ ऑक्टोबर २०२५ या दरम्यान परीक्षण केले जाईल. उभारलेल्या किल्ल्यांच्या परीक्षणाची तारिख व वेळ आयोजकाकडुन स्वतः माहित करुन घ्यावी. स्पर्धेत विजयी होणाऱ्या प्रथम तीन स्पर्धकांना व उत्तेजनार्थ तीन स्पर्धकांना बक्षिसे देण्यात येतील.

उपस्थित प्रमुख मान्यवराच्या हस्ते क्रमांक एकचे बक्षीस देण्यात येईल. मुलीसाठी स्वतंत्र बक्षिस देण्यात येई . स्पर्धक हे इयत्ता चौथी व पदवी पर्यत शिक्षण घेणारे असावेत नाव नोंदणी व संपर्कासाठी आशिष बुल्लु ८२३२७५६६८, नाथा भाऊ गिरणेकर ९२२५४८७८४४, समीर माळी ८२३७७०२५९५, शनिकेत भोईर ८९८३०९२०४८, योगेश घरत ७८२१०२१२०४, नितेश कांबळे ८१४९२४५३५८ या क्रमांकावर संपर्क करण्याचे तसेच तालुक्यातील जास्तीत जास्त स्पर्धकांनी स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

## श्रीवर्धन येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी उत्सव

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

राष्ट्र प्रथम हे ब्रीदवाक्य धारण करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला यंदा १०० वर्षे पूर्ण होत आहेत. या शताब्दी वर्षाच्या प्रारंभानिमित्ताने श्रीवर्धन येथे श्री विजयादशमी उत्सव मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक दिमाखात पार पडला. हा सोहळा रविवारी सायंकाळी ४ वाजता कुळकर्णी सभागृहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शस्त्रपूजन प्रमुख पाहुणे निलेश नात्ती यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक श्रीवर्धन तालुका कार्यवाह श्रेयस पेंडसे यांनी केले. उत्सवात स्वयंसेवकांनी घेतलेल्या ध्वज संचलन, दंड



प्रात्यक्षिक आणि सूर्यनमस्कार प्रात्यक्षिकांनी सभागृहात उपस्थितांना भारावून टाकले.

या प्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे रायगड जिल्हा प्रमुख डॉ. पराग वसंतराव पिंपळापुरे यांनी प्रमुख मार्गदर्शन करत संघाचा शंभर वर्षांचा तेजस्वी प्रवास उलगडून सांगितला. सध्या देशभरात ८३,००० पेक्षा अधिक दैनिक शाखा आणि ३२,००० साप्ताहिक मिलन सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

## वामणोली शाळेतील शिक्षकांचा ग्रामस्थांतर्फे यथोचित सन्मान



**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा बामणोली येथील माजी शिक्षिका सुधा साळवी व शिक्षिका शमिका अंबुर्ले यांचा ग्रामस्थांतर्फे शाळेत मंगळवार, ७ ऑक्टोबर २०२५ रोजी भेटवस्तु व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान तथा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांनी शाळेच्या हरहुन्नरी माजी शिक्षिका सुधा साळवी यांच्या कार्याचा विशेष गौरव करताना त्यांनी बामणोली शाळेत रुजू झाल्यावर येथील विद्यार्थ्यांना चांगल्याप्रकारे शिक्षण दिले. त्याचे फलित म्हणून आज बामणोली शाळेने नाविन्यपूर्ण शाळा म्हणून तालुक्यात नावलौकिक मिळविला आहे. याचे श्रेय शिक्षिका सुधा साळवी तसेच गावातील ग्रामस्थ व विद्यार्थ्यांच्या पालकांना जाते. शिक्षिका सुधा साळवी यांची बदली झाल्याने त्यांचा आपण ग्रामस्थांतर्फे यथोचित सत्कार समारंभ आयोजित केला आहे. यापुढेही त्यांचे बामणोली शाळेवर लक्ष राहील असेही शिंदे म्हणाले.

या कार्यक्रमास चारिझेन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा, फाउंडेशनचे मार्केटिंग हेड राकेश पडवळ, केंद्रप्रमुख शंकर शिंदे, बामणोली ग्रामपंचायतीच्या सरपंच सुवर्णा सकपाळ, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सखाराम मुंडे, माजी उपाध्यक्ष मैथिली सुतार, उपाध्यक्ष वैशाली जाधव, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य मनिषा पवार, सरिता तळेकर, अंकिता वागळेकर, अंजली सुतार, अंजली पवार, रिया पवार, गौरी पवार, दाजी करकरे राजाराम मालोरे, बाळू तळेकर आदीउपस्थित होते.

## विद्यार्थ्यांसाठी स्त्रीशक्ती नोंदणी उपक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग.तटकरे महाविद्यालय माणगाव राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित महाविद्यालयामध्ये स्त्रीशक्ती नोंदणी उपक्रम ६ ऑक्टोबर २०२५ रोजी राबवण्यात आला. यामध्ये विद्यार्थिनींना या पोर्टलवर नोंदणी करण्यास प्रोत्साहित करण्यात आले.




संपूर्ण महाविद्यालयांमध्ये याविषयी जनजागृती करण्यात आली. महिलांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या अधिक सक्षम करणे, महिलांना व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा त्याचा विस्तार करण्यासाठी आर्थिक सहाय्य देणे, महिलांना व्यावसायिक आणि कौशल्य-आधारित प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध करून देणे, महिलांना संकटकाळात मदत मिळवण्यासाठी आणि स्वतःची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी मार्गदर्शन करणे, हा उद्देश होता.

या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागातील कार्यक्रमाधिकारी प्रा. नेहा तुराई, प्राध्यापक स्वप्निल सकपाळ आणि विज्ञान विभागातून डॉ. नमिता मोरे उपस्थित होत्या. या संपूर्ण कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी एम खामकर यांचे सहकार्य लाभले.

## कृषी समृद्धी योजनेचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा; प्रशासनाचे आवाहन

**मुरूड : प्रतिनिधी**

कृषी समृद्धी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना शेती उपयोगी यंत्र, पावर टिलर, ट्रॅक्टर, भात लावणी यंत्र, भात कापणी यंत्र, भात मळणी यंत्र, ट्रॅक्टरचलित अवजारे, ब्रश कटर, एचटीपी फवारणी पंप, ३ वा५ एचपी पाण्याचे पंप इ. यंत्रांना अनुदान उपलब्ध आहे. तरी सर्व शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर आपल्या फार्मर आयडीद्वारे लॉगिन करून अर्ज सादर करावा व योजनेचा लाभ घ्याव, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

महाविस्तार एआय या ॲपच्या वापर प्रत्येक अँड्रॉइड मोबाईल धारक शेतकऱ्यांनी करावा जेणेकरून त्याद्वारे पिकांची सविस्तर माहिती, विविध पीक पद्धती, त्यावरील कीड रोग ओळख आणि नियंत्रणाचे उपाय, खत व्यवस्थापन, आरोग्य पत्रिका आधारित खत वापर, खतांच्या मात्रा काढणे, पीक सल्ला, बाजार भाव, आणि हवामान याची सविस्तर माहिती या पद्वारे शेतकऱ्यांना मिळणार आहे. त्यामुळे याचा सर्वांनीच लाभ घ्यावा.

कृषी समृद्धी योजना, महाविस्तार एआय ॲप तसेच कृषी विभागाच्या इतर योजनांची गाव पातळीवर सहाय्यक कृषी अधिकारी यांच्यामार्फत प्रचार प्रसिद्धी करण्यात येत आहे. सदर योजनेच्या लाभासाठी किंवा मार्गदर्शनासाठी सहाय्यक कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा. मुरूड तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मुरूड तालुका कृषी अधिकारी प्रज्ञा भोईटे यांनी केले आहे.

## वसुंधरा पायी दिंडीचे रायगडमध्ये जल्लोषात स्वागत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

नाणिजधाम येथील रामानंदाचार्य नरेंद्रचार्य यांच्या रामानंद संप्रदायाच्या वतीने उपपीठ मुंबई ते नाणीजधाम रत्नागिरी या 'वसुंधरा पायी दिंडीचे रायगडमध्ये जल्लोषात स्वागत करण्यात आले.

या वसुंधरा पायी दिंडीचे ठिकठीकाणी ढोल ताशांच्या गजरात तसेच लेझीम पथकांच्या उपस्थितीत जोरदार स्वागत करण्यात आले. हा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी तसेच या वसुंधरा पायी दिंडीचे स्वागत करण्यासाठी माजी नगरसेविका आरती केतन नवघरे, प्राध्यापक सुनील निकुंभ नाणीजधाम मुख्य पिठातील पदाधिकारी आणि भाविक भक्तगण मोठ्या संख्येने



उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वसुंधरा पायी दिंडीच्या निवासस्थानी वृक्षारोपण करण्यात आले.

या पायी दिंडीत जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांचे हजारो अनुयायी ज्यांना दिंडी यांत्रिकी म्हटले जाते ते हजारो किलोमीटर पायी प्रवास करून २१ ऑक्टोबर रोजी रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या जन्मोत्सव साठी श्री क्षेत्र नाणीजधाम येथे पोहोचणार आहेत उपपीठ मुंबई ते नाणीजधाम वसुंधरा पायी दिंडी ४ ते २० ऑक्टोबरदरम्यान रायगड जिल्यातील पनवेल, पेण, खालापूर व रोहा या तालुक्यातून प्रवास करत रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या जन्मोस्तव दिनी नाणीजधामकडे मार्गस्थ होणार आहे.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उद्घाटन सोहळा













































दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com